दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.०० । अंक २४३ । मंगळवार १६ जून २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

कशाला घेता ३इन १ व ४ इन १ जेव्हा रु.५० मध्ये मिळतोय
लाभच लाभ शुभलाभ ६ इन १ ६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ बेस्ट ६
६ इन १ १२०ग्रॅम
रु. 65 चा रु. 50 मध्ये
तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी
निळकंठ, अगरबत्तीचे विक्रेते
स्टॉ. केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर आडते बाजार अ.नगर






'सहजयोग'

भाग ८३

## भक्ती व ध्यानयोग

भक्ति आणि कर्माच्या संयोगातूनच ज्ञान मिळवता येते; अर्थात भक्तिमधून कर्म झाले पाहिजे; कर्म व भक्तिमध्ये फारकत उपयोगाची नाही; म्हणजे श्रीराम- काळापासून चालत आलेल्या यां भक्तीच्या नानाविध प्रकारांमुळे भक्ति करणाऱ्याने आपल्या जीवनांत मर्यादापुरुषोत्तम श्रीरामांचे गुण कसे उतरतील हे शिकणे. काया-वाचा-मनामध्ये ते अनन्यता मिळवण्यासाठी आधी आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतला पाहिजे. ज्ञानेश्वरांनी भक्तिबरोबर ध्यानयोगही सांगितला तो न समजता नुसते अनेक गैरसमजूती आल्या आहेत; खरे तर भक्तीमधील आशय नीट समजून पाहिजेत. श्रीरामाला मानणारे श्रीकृष्णाला मानणार नाहीत मोझेसला मानणारे ख्रिस्ताना मानत नाहीत.सर्व पुराणांमध्ये कुंडलिनी बद्दल सांगितलेले व लिहिलेले आहे. भक्तीमधून काय साध्य होणार? तसेच नुसती भजने गात राहूनही काही प्राप्त होत नाही. जे मिळवायचे आहे ते आधी समजले पाहिजे व ते प्राप्त होण्यासाठी आत्मसाक्षात्कार झाला,म्हणून आत्ताचा समय फार निकडीचा आहे व आत्मसाक्षात्कार मिळवण्याची हीच वेळ आहे.जन्मोजन्मी परमात्म्याचा वेगवेगळ्या मार्गांनी चाललेला शोध संपण्याची ही वेळ आहे. म्हणून माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की आत्मप्रकाशात या. शुक्रवार, फेब्रुवारी २१, १९८६ अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# ऑपरेशन टायगर...

## ठाकरेंच्या १६ आमदार आणि ७ खासदारांसोबत अंतिम बोलणी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** राज्यात सद्यस्थितीत कुठल्याही निवडणुका नसताना ठाकरेंच्या शिवसेना पक्षात वेगळा गट स्थापन होत असल्याची चर्चा सुरू आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतील ७ खासदार स्वतंत्र गट स्थापन करणार असून एकनाथ शिंदेंच्या 'ऑपरेशन टायगर'शी चर्चा होत आहे. एकीकडे ही चर्चा सुरू असताना दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार कृपाल

### शिंदेसेनेच्या आमदाराचा दावा



तुमाने यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १६ आमदार आणि ७ खासदार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अंतिम बोलणी झाल्याचा दावा त्यांनी केलाय. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला आणखी हवा मिळाली आहे. मात्र, मंत्री उदय सामंत यांनी स्पष्टपणे हा दावा फेटाळून लावला आहे.

राज्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून होत असलेल्या ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरू असतानाच शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी मातोश्रीवर खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला ९ पैकी ५ खासदारांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शवली. मात्र, त्यानंतर राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्क लावले जात आहेत.

त्यातच, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १६ आमदार आणि ७ खासदार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अंतिम बोलणी झाल्याचा दावा शिंदेंच्या शिवसेनेतील आमदार कृपाल तुमाने यांनी केला आहे. तसेच, ऑपरेशन टायगर फायनल झाले आहे, **(पान ४ वर)**

### उदय सामंतांनी ऑपरेशन टायगर फेटाळले

**उबाठाच्या कोणत्याही खासदारासोबत संपर्क नाही, अशी कोणतीही मीटिंग झाली नाही. आम्हाला ऑपरेशन टायगरची गरज नाही, असे म्हणत मंत्री तथा शिवसेना नेते उदय सामंत यांनी ऑपरेशन टायगर संदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच, संजय राऊत यांच्या पेशन्सला दाद देत त्यांनी उबाठाचं अस्तित्व टिकवलं आहे, असेही उदय सामंत यांनी म्हटले . त्यामुळे, एकप्रकारे उदय सामंत यांनी ठाकरेंचे खासदार शिंदेंच्या संपर्कात नसल्याचेच सूचवले आहे.**

### महत्त्वाचे..

#### शिक्षण सेवकांना पहिल्या दिवसापासून मिळणार 'वेतन संरक्षण'

मुंबई : पवित्र पोर्टलद्वारे शासकीय किंवा खाजगी अनुदानित शाळांमध्ये 'शिक्षण सेवक' म्हणून रुजू झालेल्या उमेदवारांसाठी राज्य सरकारने दिलासादायक निर्णय घेतला. यापूर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक पदावर आल्यानंतर 'वेतन संरक्षण' आणि 'सेवाजोड' देण्याबाबत शालेय शिक्षण विभागाने आज १५ जून २०२६ अधिकृत परिपत्रक जारी करत हा प्रश्न निकाली काढला आहे. यापूर्वी १८ फेब्रुवारी २०२६ ला घेतलेल्या शासन निर्णयाची क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी होत नसल्याने आणि अनेक प्रशासकीय अधिकारी उमेदवारांना लाभापासून वंचित ठेवत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे याची गंभीर दखल घेत सरकारने आता सर्व संभ्रम दूर करणारे स्पष्टीकरण दिले असून, नियम न पाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट कारवाईचा इशारा दिला आहे.

## जन्मदिनीही जनसेवेचा ध्यास!

# गोदा-नर्मदा जलयात्रेचा मंगल कलश अमित शाह यांना सुपूर्द

गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** वाढदिवस हा अनेकांसाठी उत्सवाचा दिवस असतो; मात्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी यंदाचा वाढदिवसही जनसेवा, जलसंवर्धन आणि विकासाच्या संकल्पांना वाहिला. एका बाजूला संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे आणि कृषीविषयक उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासली जात असताना, दुसऱ्या बाजूला दिल्लीत केंद्रीय गृह व सहकार मंत्री यांची भेट घेऊन गोदा ते नर्मदा जलयात्रेचा मंगल कलश त्यांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील उपस्थित होते.

विखे पाटील यांनी वाढदिवसाचे औचित्य साधत राज्यातील जलसंपदा विकासाला नवी दिशा देणाऱ्या नदीजोड प्रकल्पांच्या पूर्णत्वाचा निर्धार व्यक्त केला. मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली पुण्यश्लोक यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या गोदा-नर्मदा जलयात्रेची माहिती त्यांनी अमित शाह यांना दिली. जलसंवर्धन, जलसंरक्षण आणि जलसाक्षरतेचा संदेश देत महाराष्ट्र व मध्य प्रदेश यांच्यातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक नातेसंबंध अधिक दृढ करणाऱ्या या यात्रेचा मंगल कलश त्यांनी शाह यांच्याकडे सुपूर्द केला.



- दिल्लीत अमित शाह यांना गोदा-नर्मदा जलयात्रेचा मंगल कलश सुपूर्द
- नदीजोड प्रकल्प पूर्णत्वाचा वाढदिनी संकल्प
- जिल्हाभरात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप
- मोफत आरोग्य तपासणी व कृषी मार्गदर्शन उपक्रम
- वाढदिवस सामाजिक बांधिलकी आणि विकासकार्यांना समर्पित
- जनसेवा आणि विकासाभिमुख कार्यपद्धतीचे राज्यभर कौतुक

या भेटीदरम्यान राज्यातील विविध विकासकामे, जलसंपदा प्रकल्प, सहकार क्षेत्र आणि सामाजिक प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. यावेळी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष उपस्थित होते.

दरम्यान, विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरात सामाजिक उपक्रमांची मोठी चळवळ उभी राहिली. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत कार्यकर्त्यांनी फलक, जाहिराती आणि अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या, पुस्तके, दप्तर, संगणक, डिजिटल बोर्ड यांसारखे **(पान ४ वर)**

# महिलांशी मैत्री करून दागिने लंपास

## दोन पीडितांच्या तक्रारीवरून चौघे गजाआड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मैत्री करून विश्वास संपादन करत महिलांकडून लग्नासाठी सोन्याचे दागिने घेऊन त्यांचा अपहार करणाऱ्या चौघांच्या टोळीला एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केले आहे. या कारवाईत सुमारे ९ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिता गणेश नजन हिने वनिता परसराम नवले (रा. नागापूर) व अंजूम रफिक तांबोळी (रा. बोल्हेगाव) यांच्याशी मैत्री करून त्यांचा विश्वास संपादन केला. लग्नसमारंभासाठी दागिने घालायचे असल्याचे कारण सांगून तिने वनिता नवले यांच्याकडील साडेतीन तोळे सोन्याचे दागिने आणि अंजूम तांबोळी यांच्याकडील अडीच तोळे सोन्याचे दागिने घेतले. मात्र दागिने परत न करता त्यांचा अपहार करून ती फरार झाली.

याप्रकरणी वनिता नवले व अंजूम तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात २४ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान अनिता नजन, वैष्णवी नजन, गणेश नजन आणि बन्यामीन बोरुडे या चौघांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने पोलिसांनी त्यांना अटक केली.

आरोपींकडून ८ लाख ४० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, ७५ हजार रुपयांचे पाच मोबाईल फोन व सिमकार्ड असा एकूण ९ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हेमंत थोरात यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातील आरोपींची सीबीआय चौकशी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणातील तीन आरोपींची तिहार तुरुंगात जाऊन चौकशी करण्यास विशेष न्यायालयाने सीबीआयला परवानगी दिली आहे. ज्या तीन आरोपीची सीबीआय चौकशी करणार आहे, त्यात मनिषा वाघमारे, धनंजय लोखंडे आणि शुभम खैरनार यांचा समावेश आहेत.

नीट प्रश्नपत्रिका फोडण्याच्या प्रकरणात तीन आरोपी हे प्रथमदर्शनी मुख्य सूत्रधार असल्याचे दिसून येत आहे. पैशाच्या बदल्यात या आरोपींनी प्रश्नपत्रिका फोडली होती. त्यामुळे त्यांच्या चौकशीला परवानगी दिली जावी, असा अर्ज सीबीआयने न्यायालयात सादर केला होता.न्या.सुरिंदर सिंह यांनी हा अर्ज मान्य केला.नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणात तपासी संस्थेने आतापर्यंत १३ जणांना अटक केली आहेत. मे महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली होती. त्यानंतर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने २१ जून रोजी फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला होता. वाघमारे, लोखंडे आणि खैरनार हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. १७ ते १९ जून या कालावधीत तपास संस्था तिहार तुरुंगात जाऊन वरील तिघांची चौकशी करणार आहेत. दरम्यान, न्यायालयाने वरील तिघांसह अन्य आरोपींच्या कोठडीत २९ जूनपर्यंत वाढ केली आहे.

## कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपकेंना मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जयपूर :** जयपूरमध्ये, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना दोन तरुणांनी कानशिलात लगावली. त्यानंतर पक्षाच्या समर्थकांनी त्या दोघांना पकडून बेदम चोप दिला. अभिजीत नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी आणि तरुणांशी संबंधित इतर समस्यांविरुद्धच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते. अभिजीत यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंदोलक शहीद स्मारकावर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. आंदोलनादरम्यान, घोषणाबाजीवरून काही तरुणांमध्ये वाद झाला. पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले. आंदोलनस्थळी अनेक आंदोलकांचे मोबाईल फोनही चोरीला गेले. यानंतर, व्यासपीठावरून आपले मोबाईल फोन आणि सामान सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. आंदोलनात सहभागी झालेले तरुण 'मी माझ्या देशावर प्रेम करतो, मी भ्रष्टाचार नाकारतो' आणि 'पेपरफुटी थांबवा' यांसारख्या घोषणा असलेले फलक आणि तिरंगा घेऊन आले होते. ज्या तरुणाने थप्पड मारली तो म्हणाला, हे लोक जिहादी मानसिकतेचे आहेत. मी जयपूरचा आहे. मी एक राष्ट्रवादी आहे. हा अभिजीत दीपक विनाकारण देशाची दिशाभूल करत आहे. ही पेपरफुटी केवळ एक निमित्त आहे.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके शहीद स्मारकाजवळ पोहोचताच तरुणांमध्ये झटापट झाली. दीपके यांना खांद्यावर उचलून आत नेले जात होते. यावेळी जमावातील दोन तरुणांनी त्यांना झापड मारली. सीजेपीच्या सदस्यांनीही त्या तरुणाला चोप दिला. कानशिलात मारणाऱ्यांना पोलिसांनी अटक करून ताब्यात घेतले आहे.

# डिंभे धरणाच्या कालव्यात फेकून तरुणीचा खून

## तरुणाचाही आत्महत्येचा प्रयत्न; ग्रामस्थांनी वाचविले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मंचर :** मंचरजवळील निघोटवाडी फाटा येथे एका तरुणीला डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यात फेकून दिल्याची व त्यानंतर आरोपी तरुणाने स्वतः पाण्यात उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

पाण्यात उडी मारल्यानंतर आरोपी तरुणाला स्थानिकांनी वाचविले असले तरी तरुणी मात्र पाण्यात वाहून गेली होती. सुमारे १८ तासांच्या शोध मोहिमेनंतर या तरुणीचा मृतदेह सापडला आहे. याप्रकरणी

**माळशिरसजवळील तांदुळवाडी येथे विहिरीत पिकअप पडून झालेल्या दुर्घटनेनं महाराष्ट्र हळहळला आहे. एकीकडे अपघाताच्या घटना कमी होताना दिसून येत नाहीत, तर दुसरीकडे गुन्हेगारीच्या घटनाही सातत्याने घडत आहेत. पुणे जिल्ह्यातील मंचर येथे एका युवतीला धरणाच्या कालव्यात ढकलून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.**

आरोपीला मंचर पोलिसांनी अटक केली आहे. रविवारी सायंकाळी रमेश बबन कडाळे या तरुणाने स्वप्नाली भांगरे या तरुणीसोबत झटापट करून तिला डिंभे धरणाच्या उजव्या कालव्याच्या पाण्यात ढकलल्याचा आरोप आहे. स्वप्नाली भांगरेला पाण्यात ढकलल्यानंतर आरोपी रमेश कडाळेने स्वतः पाण्यात उडी मारली होती. ही बाब स्थानिकांच्या लक्षात आल्यानंतर आरोपी रमेश कडाळेला स्थानिकांनी वाचविले होते. मात्र, स्वप्नाली ही तरुणी पाण्यात वाहून गेली होती.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर मंचर पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक नागरिकांनी शोधमोहीम राबविली. तब्बल १८ तासांनंतर सोमवारी स्वप्नाली भांगरेचा मृतदेह सापडला. या प्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी रमेश बबन कडाळेला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

# भाऊसाहेब वाकचौरे गद्दारांच्या यादीत कायम?

## सस्पेन्स वाढला; राजकीय भवितव्याबाबत चर्चांना उधाण

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री



शिर्डी : शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या मुंबईतील अलीकडील बैठकीला त्यांनी अनुपस्थिती दर्शवल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. राज्यात सुरू असल्याचे बोलले जाणारे तथाकथित 'ऑपरेशन टायगर' आणि त्यात उद्धव सेनेतील काही खासदारांच्या संभाव्य भूमिकेबाबत चर्चा रंगत असताना वाकचौरे यांचे नाव पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

### राष्ट्रपतीपदाचे डोहाळे..?

राष्ट्रीय स्तरावर पुढील राष्ट्रपतीपदाच्या निवडीबाबतही राजकीय चर्चांना वेग आला आहे. दलित नेतृत्वाच्या संदर्भात मंत्री रामदास आठवले यांच्यासह विविध नावांची चर्चा होत असताना खा. भाऊसाहेब वाकचौरे यांचे नाव काही राजकीय वर्तुळांतून पुढे येत असल्याच्या चर्चा आहेत. पक्षांतर करण्यासाठी भाऊसाहेब वाकचौरे याच मुद्द्यावर अडून बसल्याची चर्चा आहे. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका किंवा घोषणा झालेली नाही.

### दोन तृतीयांश बहुमतासाठी आटापिटा...

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी (१४ जून) पक्षाच्या सर्व खासदारांची 'मातोश्री'वर बैठक बोलावली होती. मात्र या बैठकीत ९ पैकी फक्त फक्त ४ खासदार उपस्थित होते.तर इतर ५ खासदार ऑनलाइन उपस्थित असल्योच सांगितले जात आहे. मात्र यानंतर तर्क-वितर्कांना उधाण आले असून ठाकरे गटाचे ५ खासदार लोकसभा अध्यक्षांना एक पत्र देऊन नवा गट स्थापन करू शकतात, अशी चर्चा रंगली आहे. आदित्य ठाकरे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन खासदार फुटीचे दावे मात्र फेटाळले. दोन तृतीयांश बहुमत प्राप्त करण्यासाठी विरोधी पक्ष फोडण्याच्या या राजकीय घडामोडी भाजप पुरस्कृत असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.

भाऊसाहेब वाकचौरे यांची कारकीर्द केवळ राजकारणापुरती मर्यादित नाही. प्रशासकीय सेवेत त्यांनी दीर्घकाळ काम करताना विविध पदांवर उल्लेखनीय कामगिरी केली. विशेषतः शिर्डी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी केलेले काम राज्यभर चर्चेचा विषय ठरले होते. संस्थानच्या प्रशासनात पारदर्शकता, विकासकामे आणि व्यवस्थापनातील सुधारणा यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली.

प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. दलित समाजातील प्रभावी चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले. शिर्डी लोकसभा मतदारसंघात त्यांनी रिपब्लिकन नेते केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले **(पान ४ वर)**

# आरोपीकडून चोरीची मोटारसायकल जप्त : अटक

## नेवासा पोलिसांची कारवाई



**नेवासा :** तालुक्यातील नेवासा हद्दीतील एका घरासमोर लावलेली पल्सर मोटारसायकल कोणीतरी अज्ञातांनी (दि.१२ )जून रोजी ३ वाजेच्या चोरट्याने स्वत:च्या फायद्यासाठी व लबाडीच्या इराद्यातून चोरुन नेल्याची घटना घडली.या फिर्यादीवरुन पो.स्टे गु.र.नं.५०२/२०२६ भादवि न्यायसंहिता कलम ३०३ (२) प्रमाणे दाखल करण्यात आला.या गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या आदेशाने तपास पथकातील पो.उपनिरीक्षक विकास पाटील, पो.हे.कॉ. अजय साठे, पो.कॉ. नारायण डमाळे, पो.कॉ.अतुल शेळके, पो. कॉ.सुनिल गंगावणे, पो.कॉ.परमेश्वर गहाळ यांना त्याकामी आदेश देण्यात आले.या चोरीस गेलेल्या मोटारसायकल व अज्ञात आरोपीचा नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत शोध घेत असतानाच गुन्हा नवनाथ संजय हिवाळे (रा.खेडले काजळी ता.नेवासा) याने केला असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली असता चोरलेली मोटारसायकलसह श्रीरामपूर येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यास याठिकाणी वरिष्ठाच्या सुचनेने तपास पथकातील कर्मचाऱ्यानी त्या ठिकाणी सापळा लावून आरोपी नवनाथ संजय हिवाळे यास पल्सर मोटारसायकलसह ताब्यात घेतले असता सखोल विचारपूस केली त्यांनतर त्याने सदर मोटारसायकल गोगलगाव येथून चोरी केल्याची कबुली दिली. त्या आरोपीस करत पुढील कारवाईसाठी नेवासा ठाण्यात हजर करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास नेवासा पोलीस करीत आहेत.

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता हीच शाळेची खरी ओळख : आ. आशुतोष काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** प्राथमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया असून या टप्प्यात मिळालेले शिक्षण आणि संस्कार विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडतात. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण करून त्यांची बौद्धिक क्षमता विकसित करावी. कोणत्याही शाळेची ओळख केवळ भव्य इमारती, आधुनिक सुविधा किंवा शिक्षकांच्या संख्येवरून होत नसते तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता हीच त्या शाळेची खरी ओळख असते असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळपेवाडी येथे नवीन विद्यार्थ्यांचे आमदार आशुतोष काळे यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी शिक्षक, पालक विद्यार्थ्यांशी, संवाद साधला.याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, यशस्वी आयुष्याचे धडे गिरवण्यासाठी ज्ञानार्जनाच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या निरागस चिमुकल्यांसाठी शाळेचा पहिला दिवस हे पहिले महत्त्वाचे पाऊल असते.हा पहिला दिवस प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील संस्मरणीय क्षण असतो.या दिवसापासूनच ज्ञान, संस्कार आणि यशाच्या प्रवासाला सुरुवात होत असते. आजचा विद्यार्थी उद्याचा चांगला नागरिक झाला पाहिजे ह्या दृष्टीकोनातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घडवावे. शिष्यवृत्ती परीक्षा ही शाळेच्या बौद्धिक गुणवत्तेचे मोजमाप करणारी कसोटी असते. शिष्यवृत्ती परीक्षा तसेच विविध स्पर्धा आणि उपक्रमांमधील विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश यावरून शाळेची गुणवत्ता अधोरेखित होवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीतूनच शाळेची प्रतिष्ठा वाढत असते.कोळपेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचा पट टिकून आहे हि अभिमानास्पद बाब असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शैक्षणिक भौतिक गोष्टींना निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचेही वाटप करण्यात आले तसेच शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक सोनवणे यांनी शाळेला दिलेला प्रिंटर आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते शाळेला सुपूर्द करण्यात आला. यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक शकील पटेल, सरपंच सौ.चंद्रकलाताई कोळपे, सागर कोळपे, आदिनाथ कोळपे, अनिल कोळपे, महेश कोळपे, नंदकिशोर कोळपे, केंद्र प्रमुख पंडोरे, ग्रामविकास अधिकारी सय्यद तसेच शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# राहुरीच्या तरुणाची २२०० किमी पायी भक्तीयात्रा; वैष्णोदेवीचे दर्शन पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरीतील तरुण सतीश काका तनपुरे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी चलो बुलावा आया है, माता ने बुलाया है'' या अखंड श्रद्धेच्या मंत्राने प्रेरित होऊन शिर्डी (महाराष्ट्र) ते माता वैष्णोदेवी (कटरा, जम्मू) असा तब्बल २२०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वीरित्या पूर्ण करून भक्ती, जिद्द आणि चिकाटीचा प्रेरणादायी आदर्श जनसामान्यांना घालून दिला आहे. हा प्रवास सुमारे ७५ दिवस चालला होता. या यात्रेमध्ये अनेक ठिकाणी विविध अडचणी, बदललेले हवामान, शारीरिक थकवा यांना न जुमानता या तरुणांनी वैष्णव देवी मातेवरील अखंड श्रद्धा ठेवून मोठ्या ध्येयाने हा प्रवास पूर्ण केला. या प्रवासामध्ये ''जय मातादी'' च्या जयघोषात भक्तिमय वातावरणातील अनुभव घेतला व त्यांनी प्रत्येक टप्पा पार केला. या अद्वितीय कार्याबद्दल वैष्णोदेवीचे निस्सीम भक्त सतिषकाका तनपुरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून त्यांच्या जिद्दीला आणि समर्पणाला मन:पूर्वक सलाम व्यक्त करण्यात येत आहे. सफल झालेल्या या यात्रेत भास्कर शिरसाठ (आप्पा), सुभाष चोपडे, बाळासाहेब कुर्हाट, गोरक्षनाथ कटारे श्री शेटे या यात्रेत सहभागी झाले होते तर शुभकिर्ती उद्योग समूह, राहुरी यांच्या वतीने या टीमचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी श्रद्धा, संयम आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर मनुष्याला जीवनामध्ये कुठलेही ध्येय गाठता येते. याप्रसंगी आदिनाथ हारदे महाराज, देवेंद्र लांबे, रमेश नालकर, विनित धसाळ, बाळासाहेब जठार, हर्षवर्धन तनपुरे, बाळासाहेब आवारे आदिंनी त्यांना शुभेच्छा दिल्या. आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अक्षय तनपुरे यांनी केले. यावेळी रविंद्र आहेर, जालिंदर शेळके, हभप बाबासाहेब मोरे, राजेंद्र गुंजाळ, विनित सिरसाठ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन शुभकीर्ती उद्योग समूहाचे शुभम तनपुरे यांच्यासह अक्षय तनपुरे, हर्षवर्धन तनपुरे, रुद्राक्ष तनपुरे, सुरज तनपुरे यांनी केले होते. सुत्रसंचालन बापुसाहेब तनपुरे यांनी केले.



# खा. वाकचौरेंनी गेल्या दोन वर्षांत विकासाची काय मांडणी केली : उत्कर्षा रुपवते


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** शिर्डी लोकसभा मतदार संघामध्ये खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी गेल्या दोन वर्षांपासून विकासाची काय मांडणी केली याबाबत भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी सोशल मीडियाद्वारे केली आहे.याबाबत सोशल मीडियासह पत्रकारांना पाठवलेल्या निवेदनात उत्कर्षा रुपवते यांनी म्हटले आहे की सन २०२४ लोकसभा निवडणुकीला दोन वर्षे पूर्ण झाले,या दोन वर्षांमध्ये शिर्डी लोकसभा मतदारसंघामध्ये काय कामे झाली व पुढे काय नियोजित आहेत याबद्दल स्पष्टपणे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी मांडणी केली पाहिजे, आपल्या जाहीरनाम्यामध्ये खासदार वाकचौरे यांनीअनेक गोष्टी कबूल केल्या आहेत, त्याचे पुढे काय झाले याचा लेखाजोखा त्यांनी मांडला पाहिजे! मतदार संघातल्या व महाराष्ट्रातल्या देशातल्या महिला, युवक,शेतकरी,कष्टकरी,अल्पसंख्यांक,मागासवर्गीय सर्वच वंचित घटक वंचित घटकांचे प्रश्न गहन असताना त्यावर त्यांची कुठलीच भूमिका दिसून येत नाही ही शोकांतिका असल्याचे त्यांनी म्हटले आहे याबाबत खासदार वाकचौरे काय भूमिका मांडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# पुणतांब्याच्या सुपुत्राची भारतीय सैन्य दलात निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा :** येथील रोहित शैलेश कुलकर्णी याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील युवकांमध्ये देशसेवेची भावना वाढीस लागल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

भारतीय सैन्य दलात निवड झाल्यानंतर रोहित कुलकर्णी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना, ''लहानपणापासून देशसेवा करण्याचे स्वप्न होते. देशभक्तीची प्रेरणा आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर हे यश मिळवता आले,'' अशी भावना व्यक्त केली.

रोहित कुलकर्णी यांनी नुकतेच सहा महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून त्यांची सियाचेन येथे नियुक्ती झाली आहे. देशसेवेचे कर्तव्य बजावण्यासाठी ते १२ जून रोजी रवाना झाले.

त्यांच्या निवडीबद्दल हनुमान व्यायाम मंडळ, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी रोहित यांच्या जिद्द, चिकाटी आणि देशप्रेमाचे कौतुक करत त्यांना पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

बालपणापासूनच भारतीय सैन्य दलात भरती होण्याचा निर्धार केलेल्या रोहित यांनी अथक परिश्रम आणि दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुणतांबा परिसरातील राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून गौरव व्यक्त केला आहे.

# अप्पासाहेब मकासरे राज्यस्तरीय पत्रकार पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आधार फाउंडेशन व एसआर २४ न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा-२०२६'' मध्ये पत्रकार अप्पासाहेब मकासरे यांना पत्रकारितेतील निर्भीड व उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात राज्यभरातील विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तब्बल १२० कर्तृत्ववान व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार सुभाष गुंदेचा होते. प्रमुख उपस्थितीत त्र्यंबकेश्वर येथील महामंडलेश्वर मठाधिपती महंत १००८ पूजाताई नंदगिरी, खेड पंचायत समितीचे सभापती संभाजी चौधरी, पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब हंडाळ, शिवसेना नेते पै. रावसाहेब खेवरे, रवींद्र मोरे, संतोष चोळके, रामदास बाचकर, विजयराव तमनर, ह.भ.प. राधिकाताई खेमनर आदी मान्यवर उपस्थित होते. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव व्हावा आणि सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महात्मा फुले कृषी विद्यापीठातील डॉ. आण्णासाहेब शिंदे सभागृहात हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार रमेश खेमनर यांनी केले होते.



# रावसाहेब पवार यांना दिल्ली येथे ऑनररी डॉक्टरेट प्रदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** ग्रामीण भागाची नाळ समजल्या जाणाऱ्या शिव प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष असलेल्या रावसाहेब पवार यांनी ग्रामीण भागातील मुलांसाठी सर्वत्र इंग्रजी माध्यमाचा बोलबाला असताना देखील मराठी माध्यमाची व त्याला सेमी इंग्रजीची जोड असणारी शिवांकुर विद्यालय कोंढवड, शिवांकुर रेनबो स्कूल राहुरी, शिवांकुर विस्डम स्कूल खडांबे ह्या अतिशय दर्जेदार, शिस्तप्रिय शाळा सुरू करून ग्रामीण भागातील मुलांसाठी संधी उपलब्ध करून दिली.

संस्थेच्या माध्यमातून नियमित वृक्षारोपण, सामाजिक कार्य, रक्तदान शिबिर, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी समुपदेशन वर्गाचे आयोजन तसेच शिवांकुर पतसंस्थेच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांचा विश्वास संपादन करून नवीन व्यावसायिकांसाठी एक चांगली संधी उपलब्ध करून दिली.

शिव प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब नामदेव पवार यांनी सन २०१३ सालापासून सुरू केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ऋऊअछघऋजठ्ठ खछढएठछअढखजछअङ णछखतएठडखढध णपळींशव डीरींशी या संस्थेच्यावतीने झहळश्ररपींहअेंूयि क्षेत्रात केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत ऑनररी डॉक्टरेट ही पदवी दिनांक ६ जून २०२६

रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या पदवीग्रहण समारंभात युनिव्हर्सिटीच्या अधिकृत व देशभरातून उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रदान केली.

# गो-शाळेतील गाईंसाठी धोंडा पंगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील पूर्व भागातील धार्मिक दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या दाढ खुर्द येथे सोमवती अमावस्या निमित्त सोमवार दि. १५ जून रोजी विठाई परिवार महाराष्ट्र राज्य या सेवाभावी संस्थेडरे श्री लक्ष्मीनारायण गोशाळा (आनंद दिवाकर तीर्थ) दाढ खुर्द तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर या गोशाळेतील १२५ देशी वंशाच्या गोमातेंसाठी धोंडा पंगत आयोजित करण्यात आली होती. यानिमित्त ५१ किलो बदाम आंब्यांपासून आमरस व ७० किलो गुळाची लापशी बनवून गाईंना खाऊ घालण्यात आली. या उपक्रमाविषयी माहिती देतांना विठाई टूर्स चे संचालक ह.भ.प.डॉ. मुकुंद जोरी पाटील यांनी सांगितले की अनेक वर्षांपासून विठाई परिवाराच्या माध्यमातून विविध तीर्थयात्रा व धार्मिक सहली तसेच अध्यात्मिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात त्यापैकी प्रत्येक महिन्याच्या अमावस्येला गोशाळेतील गाईंसाठी ७० किलो गुळाची लापशी बनवण्यात येते तसेच वेळोवेळी हिरव्या चाऱ्यासाठी देखील आर्थिक मदत विठाई संस्थेच्या माध्यमातून करण्यात येते. यावेळच्या अधिकमासाची सुरुवात शनी जयंती, शनी अमावस्याने झाली व शेवट सोमवती अमावस्येने झाला हा शेकडो वर्षानंतर आलेला दुर्मिळयोग असून पुरुषोत्तम मास अधिक पुण्य फलदायी असतो. त्यामुळे सर्वांनी या अन्नदानाच्या उपक्रमात सहभागी होवून पुण्यार्जन करावे असे आवाहन करण्यात आले.

# ग्रामसेवक व अधिकाऱ्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमामध्ये नेवासा तालुक्यातील चार ग्रामपंचायतचे ग्रामसेवक व पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांच्या आयोजित सेवापूर्ती गौरव सोहळयास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी हितचिंतकांनी सेवानिवृत्त झालेल्या ग्रामसेवकांचा सत्कार करून शुभेच्छाचा वर्षाव केलागावाच्या उत्कर्षासाठी दुवा असलेल्या ग्रामसेवकांच्या कार्याचा गौरव सेवापूर्ती सोहळयात यावेळी करण्यात आला.

यावेळी झालेल्या सेवापूर्ती गौरव सोहळयास सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री,आ. विठ्ठलराव लंघे, माजी आ. पांडुरंग अभंग, ग्रामसेवक संघटनेचे राज्य अध्यक्ष संजीव निकम, गटविकास अधिकारी संजय लखवाल, अंकुश महाराज जगताप, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर, युवराज ढेरे, सहायक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार,माजी अध्यक्ष एकनाथ ढाकणे, विस्तार अधिकारी सुवर्णा लेंढे, नानासाहेब तुवर, अशोक शेळके, भाजपचे तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी संघाचे नेवासा तालुकाध्यक्ष ज्ञानदेव शिंदे, तुकाराम शेंडे,महंत उद्धवजी महाराज,पांडुरंग अभंग, आमदार विठ्ठलराव लंघे यांनी मनोगत व्यक्त करत ग्रामसेवकांनी गावाच्या उत्कर्षासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. ग्रामपंचायत अधिकारी सतीश मोटे व बाळासाहेब झिने सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले यावेळी उपस्थित अधिकारी ग्रामसेवक संघ व संघटनेचे पदाधिकारी हितचिंतकांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.




# पालकमंत्री विखे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** येथे अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने डॉ. सुजयदादा राधाकृष्ण विखे पाटील प्रणित जनसेवा युवा मंच, झरेकाठी यांच्या वतीने प्रवरा माध्यमिक विद्यालय तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना वह्या व इतर शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक उकिरडे यांनी मार्गदर्शन करताना वाढदिवस, विवाह समारंभ आदी प्रसंगी होणारा अनावश्यक खर्च टाळून गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, काही विद्यार्थ्यांकडे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतरही वह्या उपलब्ध नसतात. अशा विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे ही समाजाची जबाबदारी आहे. तसेच शाळेतून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या शाळेसाठी योगदान देऊन शाळा समृद्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

कार्यक्रमास जनसेवा युवा मंचाचे पदाधिकारी व सदस्य, शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# भक्तनिवास मध्ये महीला असुरक्षित, २० वर्षाच्या मुलीची छेड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी :** पश्चिम बंगाल राज्यातील हावडा जिल्ह्यातील साई भक्त आपल्या कुटूंबासमवेत ४ जून रोजी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत आले असता संस्थान च्या भक्तनिवास मधे रूम घेऊन दर्शना साठी गेले असता रूम मध्ये थांबलेल्या २० वर्ष वयाच्या मुलीची तेथील कर्मचाऱ्यानेच छेड काढल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सदर कुटुंब साई संस्थानच्या भक्तनिवासात मुक्कामी होते. ५ जून रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणीचे आई-वडील व बहीण हे मुलीला रूममध्ये ठेवून ते दर्शनासाठी मंदिरात गेले होते. तेथे स्वच्छता विभागात काम करणा कंत्राटी कर्मचारी अमन पठाण (रा. वाळकी, ता. राहाता) याने त्या रुम मध्ये प्रवेश करत मुलीला दुसऱ्या रूममध्ये नेले, व लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून मोबाईल नंबर मागितला. त्याने आपले नाव अमन पठाण असल्याचे सांगितले. घाबरलेल्या अवस्थेत पीडित तरुणी तेथून पळून आपल्या खोलीत परतली. सदर प्रकार मुलीने आपल्या आई वडिलांना सांगीतले असता पीडितेच्या तक्रारीवरून शिर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. संस्थान कार्य क्षेत्रात महिला सुरक्षा धोक्यात साई बाबा संस्थानच्या कार्यक्षेत्रात महिलांचे सुरक्षा धोक्यात असल्याचे सदर घटनेवरून दिसून येत आहे. एकीकडे कार्यालयात बसून थातूरमातूर वस्तू सापडल्याचे फोटो काढून चमकोगीरी करायची व स्रियांची सुरक्षा धोक्यात घालायची हा प्रकार सध्या संरक्षण विभागात सुरू असून सुरक्षा प्रमुख रोहीदास माळी यांनी प्रत्येक विभागात दररोज गस्त घातली तर गुन्हेगारीवर जरब बसणार आहे. सुरक्षा अधिकाऱ्याला जर मंदीर सुटत नसेल तर भविष्यात अशा गंभीर घटनांना जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

द•ख•ल

## मांडवे खुर्द अधिक मासानिमित्ताने त्रिदिनी सप्ताहाची सांगता

**साकूर** : पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील मांडव्यऋषींच्या पावन भूमीत दिल बादशाह बाबा गडावर अधिक मासानिमित्त त्रिदिनी सप्ताहाची उत्साहात सांगता झाली.गुरूवारी (दि.११ )जून ते रविवार (दि. १४ ) जून यादरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताह काळात विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. दैनंदिन कार्यक्रम सकाळी चार ते सहा काकड भजन त्यानंतर साडेसात ते बारा तुकाराम गाथा पारायण सायंकाळी पाच ते सात हरिपाठ रात्री ७ ते ९ यावेळी जाहीर हरी किर्तन नंतर हरिजागरचा कार्यक्रम पार पडला. यावेळी महाराष्ट्रातील नामवत किर्तनकारानी अमृतवाणीतून किर्तन सेवा देत भाविकांना मंत्रमुग्ध केले. या काल्याच्या किर्तनाने सागता झाली. सप्ताह काळात आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## काचोळे विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत व गुणवंतांचे सत्कार



**श्रीरामपूर** : येथील रयत शिक्षण संस्थेचे डी डी काचोळे माध्यमिक विद्यालयामध्ये नवीन विद्यार्थ्यांचे व संगीत क्षेत्रात नेत्रदीपक यश मिळवल्या विद्यार्थ्यांचे स्वागत व सत्कार प्रकाश निकम चेअरमन बांधकाम समिती, जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष, प्रसिद्ध उद्योजक श्री किशोरशेठ गदिया, सेक्रेटरी गणेश थोरात, नगरसेविका योगिता नागले हे उपस्थित होते.प्रथम नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व बिस्किटे देऊन विद्यालयात स्वागत करण्यात आले. यावेळी नवीन विद्यार्थ्यांची प्रभात फेरी बँड पथक व ढोल पथकाच्या तालावर श्रीरामपूर शहरातून काढण्यात आली. याप्रसंगी वैभवी साळुंके व सिद्धी साळुंके यांनी संगीत क्षेत्रात बेंगलोर येथील संस्थेतून घेण्यात आलेल्या परीक्षेत नैपुण्य प्राप्त केल्याबद्दल सत्कार व प्रकाश पाटील निकम तसेच किशोर शेठ गदिया, सामाजिक कार्यकर्ते गणेश थोरात, नगरसेविका योगिता ताई नागले, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील साळवे, पर्यवेक्षक सूर्यकांत सराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

## शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांचे फुले बिस्किटे देऊन स्वागत




**राहुरी** : राहुरीतील नूतन कन्या शाळा राहुरी येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थिनींची प्रभात फेरी काढण्यात आली. बालाजी मंदिरात जाऊन सर्वांनी आशीर्वाद घेऊन नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली. प्रभात फेरी शाळेत आल्यानंतर पहिलीतील विद्यार्थिनींचे फूले व बिस्कीट देऊन स्वागत करण्यात आले. शाळा पूर्वतयारी मेळावा घेण्यात आला. त्यानंतर शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कविताताई माळी, उपाध्यक्ष आशाताई गायकवाड तसेच पालकांच्या हस्ते विद्यार्थिनींना नवीन गणवेश, पाठ्यपुस्तक व बूट सॉक्स यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आव्हाड यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका भोजने जयश्री यांनी आपल्या मनोगतामध्ये शाळेची शिस्त व गुणवत्ता याविषयी माहिती दिली.

सर्व पालकांनी आपापल्या वस्तीतील जास्तीत जास्त मुलींनी नूतन कन्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी इतरांना प्रोत्साहित करावे असे आव्हान करण्यात आले. उपस्थितांचे आभार तोरडमल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी झिंजाडे तसेच झोंबाडे यांनी प्रयत्न केले. शालेय पोषण आहारामध्ये विद्यार्थिनींना गोड जेवण देण्यात आले.

## खडकेवाकेत गायकवाड परिवाराकडून शालेय साहित्य वाटप

**शिर्डी** : राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोकळे वस्ती येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. ना. विखे यांचे सूचनेनुसार पुष्पगुच्छ शाल हार यांचा खर्च न करता शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप करण्यात आले. भीमशक्ती सामाजिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल गायकवाड यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिली तसेच इतर शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी अनिल गायकवाड म्हणाले की, ना. विखे हे जनतेच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेले लोकनेते आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय वस्तू भेट देऊन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचा छोटासा प्रयत्न केला. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे हीच आमची भावना आहे. असे गायकवाड म्हणाले.ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थ, पालक व शिक्षकांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनीही शालेय साहित्य मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी, जनसेवा परिवर्तन मंडळाचे संदिप लावरे पाटील साईबाबा दूध संकलन केंद्राचे चेअरमन शरद मुरादे जि.प.प्रा.शाळेचे व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष कैलास मुरादे यांनी याचे मनोगत व्यक्त केले. यावेळी संदेश गायकवाड राजेंद्र मुरादे ऋषी गायकवाड रामभाऊ मुरादे अक्षय गायकवाड सागर मुरादे कैलास मुरादे व तसेच शाळेच मुख्याध्यापक संदिप वाघमारे, दिनेश राठोड, सदगीर यांच्यासह आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे यांनी केले .

# जून महिन्यातही राहुरी खुर्दकरांची पाण्यासाठी पळापळ

## आठवड्याला पाणीपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक संतप्त

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : जून महिना सुरू होऊनही राहुरी खुर्द परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न कायम असून नागरिकांना पाण्यासाठी अजूनही वणवण भटकावे लागत आहे. महिन्याच्या सुरुवातीलाच पाणीपुरवठा अनेक दिवस खंडित राहिला होता. त्यानंतर आता जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पुन्हा एकदा पाणीपुरवठा बंद झाल्याने नागरिकांचे हाल वाढले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून १४ गाव पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने पाणीपुरवठा नियमित होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. आठवड्याला पाणीपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पिण्याच्या आण दैनंदिन वापराच्या पाण्यासाठी महिला, पुरुष तसेच लहान मुलांनाही घराबाहेर पडून पाण्याचा शोध घ्यावा लागत आहे. अनेक



कुटुंबांना स्वखर्चाने टँकरचे पाणी घ्यावे लागत असून काही नागरिक मोटरसायकलवर ड्रम बांधून दूरवरून पाणी आणत आहेत.

पाण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर तसेच व्यवसायावरही परिणाम होत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पाणीपुरवठा कधी बंद राहणार किंवा कधी सुरू होणार याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय अधिकच वाढत आहे. पाणीपुरवठा नियमित नसेल, तर पाणीपट्टीही त्याच प्रमाणात आकारण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

विशेष म्हणजे गावातून मुळा नदी वाहते, परिसरात धरण आहे, ग्रामपंचायतीकडे स्वतःची विहीर, बोअरवेल तसेच आरओ प्लांटची सुविधाही उपलब्ध आहे. मात्र, या सर्व सुविधा असूनही नागरिकांना नियमित पाणी मिळत नसल्याने धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, आठवड्याला पाणीपुरवठा खंडित होत असल्याने संबंधित विभागाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत ग्रामपंचायतीने पर्यायी व्यवस्था म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

## ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : काल १५ जून रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दीपक अण्णा पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजप तालुका सरचिटणीस भैरव पा. कांगूने यांच्या वतीने घुमनदेव ता. श्रीरामपूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ९६ विद्यार्थ्यांना शालेय वह्यां पुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले. ना. विखे पाटील यांच्या रूपाने एका अभ्यासू व चांगले नेतृत्व राज्याला लाभले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील व गावातील विविध प्रश्न सोडवता येतील असे यावेळेस भाजपचे ता. सरचिटणीस भैरव कांगुणे म्हणाले. त्याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे आबासाहेब शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष दत्तात्रय कांगुणे, रावसाहेब जाधव, आबासाहेब मते, बापूसाहेब जाधव, माजी सरपंच बाळासाहेब साहेबराव कागुणे,माजी सरपंच अशोक परदेशी, राजेंद्र बोडखे आदी ग्रामस्थ उपस्थित होते याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पिंगळे, शिक्षक क्षीरसागर, बिडकर, वाघ आदी उपस्थित होते.

# नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीचे नियोजन करा : डॉ. कदम

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : शेती क्षेत्रात बदलते हवामान, उत्पादन खर्चात वाढ, बाजारभावातील अनिश्चितता आणि घटते उत्पादन अशा विविध समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान आत्मसात करून पिकांच्या गरजेनुसार खत, पाणी व रोग-किड व्यवस्थापनाचे नियोजन करणे आवश्यक आहे.

तसेच संरक्षित शेती आणि एकात्मिक शेती पद्धतीवर भर देत शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे काळाची गरज असलयाचे प्रतिपादन बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी केले. जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, संस्थेचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या संकल्पनेतून आयोजित 'खरीप शेतकरी मेळावा' या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, डॉ. विलास घुले, डॉ. विठ्ठल विखे, सज्जला लांडगे, डॉ. प्रियंका खर्डे, कैलास लोंढे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करतांना डॉ. कदम म्हणाले की, कृषी क्षेत्रातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी उत्पादन तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान घेणे आवश्यक आहे.




बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्र आणि प्रवरा कृषी विज्ञान संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट बांधावर जाऊन मार्गदर्शन केले जात आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार आगामी काळात पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता असून एल-निनोचा प्रभावही जाणवू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी उपलब्ध संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करून पीक नियोजन करावे. जसे शरीराच्या सुदृढ वाढीसाठी योग्य आहार नियोजन आवश्यक असते, त्याचप्रमाणे पिकांच्या वाढीसाठीही त्यांच्या गरजेनुसार खत, पाणी आणि संरक्षणाचे नियोजन करणे गरजेचे आहे, असे सांगत त्यांनी नवीन तंत्रज्ञान समजून घेण्याचे आणि त्याचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि बाजरी या पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान, खत व्यवस्थापन आणि आधुनिक शेती पद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. विठ्ठल विखे यांनी पावसाळ्यातील पशुधन व्यवस्थापन, चारा पिके, पशू-पक्ष्यांची काळजी आणि लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. विलास घुले यांनी भाजीपाला आणि फळबाग लागवडीचे तंत्र, तसेच फळबागांची निगा व व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. सज्जला लांडगे यांनी उत्पादित मालावरील प्रक्रिया, साठवणूक आणि मूल्यवर्धन व किचन गार्डन यांचे महत्त्व अधोरेखित केले.

तर डॉ. प्रियंका खर्डे यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती देत बियाणे व खते खरेदीसाठी शेतकरी गट आणि संघटनांच्या भूमिकेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. प्रियंका खर्डे यांनी केले.

# ऑपरेशन मुस्कान अंतर्गत ११४ व्या मुलीचा शोध !

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : ऑपरेशन मुस्कान अभियानांतर्गत राहुरी पोलिसांकडून मागील ९ वर्षात अपहरण झालेल्या तब्बल ११४ मुलींचा मागील दोन वर्षात शोध घेऊन पालकांच्या ताब्यात देण्यात आल्या. एका अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याबाबत तिच्या पालकांनी राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता.

या अल्पवयीन मुलीचा शोध घेऊन पोलिस तपास पथकांनी ताब्यात घेऊन सुरक्षितपणे बालगृहाच्या ताब्यात दिले. ही मुलगी कोणाला काही एक न सांगता निघून गेली व परत आली नाही म्हणून मुलीचे अपहरण झाल्याबाबत राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या मुलीचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तुळशीदास गीते, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे, पोलीस कॉन्स्टेबल नदीम शेख यांनी शोध घेऊन तिला तिच्या पालकांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी सखोल तपास सुरू आहे. राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक तुळशीदास गीते, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे, नदीम शेख यांनी तपास केला असून तपासास तांत्रिक मदत मोबाइल सेल श्रीरामपूर येथील कर्मचाऱ्यांनी दिली. पोलिसांकडून बेपत्ता असलेल्या मुलींचा शोध घेऊन त्यांना पुन्हा त्यांच्या पालकांकडे सोपवण्यात येत आहे. यासाठी ऑपरेशन मुस्कान राबवण्यात येत असल्याची माहिती यावेळी राहुरी पोलिसांच्यावतीने देण्यात आली आहे.

## सेंद्रिय शेतीचा अवलंब करा; कृषी अधिकारी अशोक खेडकर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शेतीतील वाढता उत्पादन खर्च, घटते उत्पन्न आणि जमिनीची कमी होत चाललेली सुपीकता लक्षात घेता शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे, असे आवाहन पंचायत समितीचे कृषी अधिकारी अशोक खेडकर यांनी केले. श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'खेती बचाव' अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्र शासनाने १ ते ३० जून या कालावधीत 'खेती बचाव' अभियान राबविण्याचे निर्देश दिले असून त्याअंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

खेडकर यांनी सांगितले की, रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीची गुणवत्ता खालावत असून त्याचे दुष्परिणाम मानवी आरोग्यावरही होत आहेत. त्यामुळे माती परीक्षण करून खतांचा वापर करणे, बीजप्रक्रिया, नॅनो युरिया, नॅनो डीएपी, सेंद्रिय खते, हिरवळीची खते, जीवामृत तसेच जैविक खतांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. कीटकनाशकांचा वापर




कमी करण्यासाठी दशपर्णी अर्क, निमार्क आणि जीवामृत यांसारख्या सेंद्रिय पर्यायांचा अवलंब करावा. यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन जमिनीची सुपीकता टिकून राहण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. मुयर निमसे, जगन्नाथ थोरात, धनंजय थोरात, संदीप मुसमाडे, अशोक मुसमाडे, सागर पवार, इंद्रजीत मुसमाडे, ओम जगधने, बाबू गोळे, शरद थोरात, रोहित कर्डिले, राहुल फुल पगार, प्रशांत थोरात , प्रशांत नानासाहेब थोरात, प्रतीक दादासाहेब थोरात , सतीश थोरात कार्यक्रमास परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सागर चव्हाण यांनी केले.

# जि.प.शाळेत पहिलीत प्रवेश घेणाऱ्या नवागतांचे पुस्तके गणवेश देऊन स्वागत

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा खुर्द जिल्हा परिषदेच्या सेमी इंग्लिश मराठी मुलांच्या शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या नवागतांचे झांज व ढोल पथकाद्वारे मिरवणूक काढून वाजतगाजत स्वागत करण्यात आले. शासनाच्या धोरणानुसार पाठयपुस्तकांसह बूट व गणवेशाचे वाटप करून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आले.

यावेळी झालेल्या स्वागत कार्यक्रम प्रसंगी प्रशिक्षणार्थी शिक्षणाधिकारी क्रांती आरसुड,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.प्राजक्ता कडू पाटील हया होत्या तर माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार,केंद्र प्रमुख बाळासाहेब काशीद,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण,स्वप्नील मगर, अँड.अनिल लोखंडे, रत्नाकर पागिरे,नंदू चौधरी,छायाताई पागिरे, सुहास खाडे, अँड.इरफान शेख,अस्लम मणियार, ज्ञानेश्वर कोकणे, किरण भोसले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक असिफ शेख यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करत प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थी शिक्षणाधिकारी क्रांती आरसुड व माजी जिल्हा परिषद सदस्य महंमद आत्तार,सुरक्षा रक्षक बाबा पवार,केंद्र प्रमुख बाळासाहेब काशीद यांनी विद्यार्थी पालकांना मोलाचे मार्गदर्शन करू दर्जेदार शिक्षण देत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेतच आपली मुले घालावीत असे आवाहन केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे शिक्षक अण्णासाहेब शिंदे,आदर्श शिक्षिका सुनीता कर्जुले-राऊत, श्रीमती मीनाक्षी लोळगे,विद्या खामकर,ज्योती गाडेकर, अश्विनी मोरे, अर्चना बोकारे, प्रतिभा गाडेकर यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदर्श शिक्षिका सुनीता कर्जुले यांनी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर शिक्षिका ज्योती गाडेकर यांनी उपस्थित मान्यवर व पालकांचे आभार मानले.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कोपरगाव यांचे कार्यालय, ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर**

क्र. कावि/गौख/२८७/२०२६
कोपरगाव दि. १५/०६/२०२६

### प्रेस नोट

**वाळूसाठ्याचा जाहीर लिलाव**

मौजे सुरेगाव डेपो क्र. १. कुंभारी डेपो क्र. १ व मायगाव देवी ता. कोपरगांव येथील डेपो मधील शिल्लक वाळू साठ्याचा लिलाव करणे बाबत.

कोपरगाव तालुक्यातील मौजे सुरेगाव डेपो क्र. १ मध्ये ३३.७८ ब्रास, कुंभारी डेपो क्र. १ मध्ये ७०.२२ ब्रास व मायगाव देवी येथील डेपो मध्ये ढीग क्र. १ मध्ये ६२० ब्रास व ढीग क्र. २ मध्ये ५४५ ब्रास या डेपोमधील प्रत्यक्षातील शिल्लक वाळूसाठ्याचा जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन गौणखनिजाची रक्कम वसुल करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी शिर्डी यांचे यांचेकडील पत्र जा.क्र. कावि/जमीन २ब/गौख/E-८४९१७१७/२०२६ दि. १०/०४/२०२६ अन्वये तहसीलदार कोपरगाव यांना आदेशीत केले आहे. त्यानुसार दि.२२/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. तहसिल कार्यालय कोपरगाव येथे मौजे सुरेगाव डेपो क्र. १, कुंभारी डेपो क्र. १ व मायगाव देवी येथील डेपो मधील प्रत्यक्षातील शिल्लक वाळू साठ्याचा लिलाव करण्यात येत आहे. तरी जास्तीत जास्त ईच्छुक व्यक्ती/संस्थांनी लिलावात भाग घ्यावा. लिलावातील अटी व शर्ती, लिलावात असलेले साठ्याच्या, हातची किंमत, बाबत कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय कोपरगाव येथे संपर्क साधावा.

**सदर डेपो मध्ये शिल्लक असलेल्या वाळूसाठ्याचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | डेपोचे नाव | डेपोमध्ये शिल्लक वाळू साठा (ब्रास मध्ये) |
|---|---|---|
| १ | सुरेगाव डेपो क्र. १ | ३३.७८ |
| २ | कुंभारी डेपो क्र. १ | ७०.२२ |
| ३ | मायगाव देवी ढीग क्र. १ | ६२० |
| ४ | मायगाव देवी ढीग क्र. २ | ५४५ |

**तहसिलदार कोपरगाव**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे गोपाळपुर ता. नेवासा जि. अहिल्यानगर व परिसरातील लोकानां कळविण्यात येते की, मौजे गोपाळपुर ता. नेवासा येथील गट नंबर ७४/२ पैकी क्षेत्र १ हे. ०० आर हे आमचे अशिल धर्मराज शिवाजी घुले यांचे मालकी कब्जेवहिवाटीचे होते व आहे. आमचे अशिलास पैश्याची गरज लागली म्हणून व्याजाने पैसे देणारे श्री राहुल आबासाहेब उकीर्डे रा. ढोरजळगांव ने, ता. शेवगाव यांच्याशी त्यांचे मेव्हणे सुनिल नामदवे नन्हे रा. रांजणी, ता. शेवगांव, यांच्या मार्फत ४,२०,०००/- चे मागणी केली तेव्हा त्यांनी पैश्याला धर म्हणुन आमचे अशिलाचे वरील गट नं. ७४/२ पैकी ० हे. ४० आर क्षेत्र गहाण ठेवण्याचे सांगितले. त्याप्रमाणे आमचे अशिलाने गहाणाचा ० हे. ४० आर क्षेत्राचा व्यवहार दि. ४/९/२०२४ रोजी करुन दिला व सदर व्यवहार १५ महिण्याच्या मुदतीनंतर सोडुन घेण्याचे ठरले. परंतु सदर ४,२०,०००/- रुपयाचे दुप्पट रक्कम ८,४०,०००/- देण्याचे ठरले. त्याप्रमाणे मुदत संपल्यानंतर आमचे अशिलाने त्यांची रक्कम रु. ८,४०,०००/- दिली. व सदर जमिनीचे रेकॉर्डला कोणतीही नोंद न करण्याचे ठरले होते, व ताबा आमचे अशिलाकडेच ठेवण्याचे ठरलेले होते व आहे. त्यांनी फसवुन गहाण ऐवजी खरेदीखताचा दस्त करुन घेतला आहे.

रक्कम दिल्यानंतर आमचे अशिलाने त्यांना अनेकवेळा गहाणाचा दसत उलटुन देण्याची मागणी केली परंतु त्यांनी आणखी पैसे मिळण्याच्या अभिलाषेने सदर दस्त उलटुन न देता आणखी रक्कमेची मागणी केली तेव्हा आमचे अशिलाने मध्यस्था व साक्षीदारामार्फत दस्त उलटुन देण्याची मागणी केली. परंतु दस्त उलटुन न देता उलट सदर दस्तानुसार रेकॉर्डला नोंद आमचे अशिलाच्या अपरोक्ष लावुन घेतली. तेव्हा आमचे अशिलाने पुन्हा सदरचा दस्त उलटुन देण्याची मागणी केली असता दस्त उलटुन दिला नाही. उलट सदर जमिन विक्री करण्याची धमकी दिली. त्याबाबत आमचे अशिल अलाहिदा योग्य त्या न्यायालयात दिवाणी व फौजदारी कारवाई करणार आहेत. परंतु ७/१२ रेकॉर्डला राहुल आबासाहेब उकीर्डे यांची पोकळीस्त बेकायदेशीर नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन त्यांनी विक्रीची सौदेबाजी सुरु केलेली आहे. त्यामुळे कोणाचेही काहीएक नुकसान होवु नये या हेतुने सदर जाहिर नोटीस देणे भाग पडले आहे.

अशा परिस्थितीत मौजे गोपाळपुर, ता. नेवासा येथील गट नंबर ७४/२ क्षेत्र ० हे. ४० आर क्षेत्रास असलेली राहुल आबासाहेब उकीर्डे यांचेकडुन खरेदीचा अगर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा दस्त नोंदवून घेवु नये व सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. तसे केल्यास व्यवहार करणाऱ्यास काही एक अधिकार हक्क मिळणार नाहीत याची नोंद घ्यावी. असे असताना कोणी काही व्यवहार केल्यास त्याच्या खर्चाची, परिणामांची व आमचे अशिलाच्या नुकसानीची सर्व जबाबदारी व्यवहार करणाऱ्यावर राहील. याची नोंद घ्यावी. केवळ लोकहितासाठी, बाधा येउ नये व भविष्यात वाद उदभवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

नेवासा
दिनांक : १५/०६/२०२६
नोटीस देणार
(धर्मराज शिवाजी घुले)

**अँड. तात्यासाहेब बापूसाहेब पा. ढोकणे**
**बी.ए. (ऑनर्स), एल एल.बी.**
**नेवासा अँडव्होकेट**
**मो.९४२३३८७२५५**

# शेतकऱ्यांना आठ तास वीज मिळण्यासाठी महावितरण कार्यालयात शेतकऱ्यांचा ठिय्या !

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील महावितरण कार्यालयात शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत दिवसा सलग आठ तास वीजपुरवठ्याची मागणी केली. रात्रीच्या वेळेत शेतीला पाणी देताना साप, बिबट्या आणि चोरट्यांची भीती असल्याने शेतकऱ्यांचे प्राण धोक्यात येत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. जोपर्यंत आमचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



देवळाली प्रवरा महावितरण कार्यालयासमोर शेकडो शेतकरी एकत्र येत ठिय्या आंदोलनाला ठाण मांडून बसले . दिवसा किमान आठ तास नियमित वीजपुरवठा मिळावा, ही आंदोलकांची प्रमुख मागणी होती. रात्रीच्या अंधारात शेतीला पाणी देण्यासाठी जावे लागत असल्याने साप, बिबट्या आणि चोरट्यांचा धोका वाढत असून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, असे आंदोलकांनी सांगितले.

महावितरण प्रशासनाने तातडीने दिवसा वीजपुरवठ्याचे नियोजन करावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला. सुमारे दोन तास सुरू असलेल्या आंदोलनानंतर महावितरण अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करत शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात शेतकरी सेनेचे नेते रवींद्र मोरे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोंढे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रकाश देठे, सचिन करपे, अमोल पवार, सचिन पवार, प्रदीप पवार, रमेश मोरे, नामदेव चव्हाण, वसंतराव कदम, वसंतराव पवार, सोपान पवार, तुकाराम साळुंखे, शेषराव साळुंखे, महेश पठारे, सुनील ढुस, अनुप कणसे, सुनील सिनारे, गणेश निमसे, कैलास चोथे, शशांक पवार, सचिन कोळसे यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

# पान १ वरुन

## जन्मदिनीही जनसेवेचा ध्यास!

शैक्षणिक साहित्य संकलित केले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सभागृहात मोठ्या प्रमाणावर हे साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी कृषी मार्गदर्शन उपक्रम राबविण्यात आले, तर पायरेन्स संस्थेच्या डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटलतर्फे नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरे आयोजित करण्यात आली. प्रवरा उद्योग समूहातील विविध संस्थांनीही सामाजिक कार्यातून विखे पाटील यांना शुभेच्छा दिल्या. राजकारणात सक्रिय असतानाही वाढदिवसाचा दिवस समाजोपयोगी उपक्रमांना आणि राज्याच्या विकासदृष्टीला अर्पण करण्याची विखे पाटील यांची कार्यशैली पुन्हा एकदा अधोरेखित झाली. जन्मदिनीही काम आणि विकासाचा ध्यास ही त्यांची ओळख यानिमित्ताने अधिक ठळक झाली असून, नदीजोड प्रकल्प पूर्णत्वाला नेण्याचा त्यांचा संकल्प आणि जलसंपदा क्षेत्रातील दूरदृष्टी राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे.

## भाऊसाहेब वाकचौरे गद्दारांच्या यादीत कायम?

यांच्याशी थेट झुंज देत विजय मिळवला होता. त्या विजयामुळे राज्याच्या राजकारणात त्यांची स्वतंत्र छाप निर्माण झाली. मात्र त्यांच्या राजकीय प्रवासात अनेक नाट्यमय वळणे आली. विविध पक्षांशी जवळीक, बदलती राजकीय समीकरणे आणि वेळोवेळी घेतलेल्या भूमिकांमुळे त्यांच्यावर 'दल बदलू' अशी टीकाही झाली. माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी केवळ १४ दिवसात त्यांचा पराभव केला. पक्ष बदलल्यानंतर नागरिकांनी ठिकठिकाणी काळे फासून त्यांचा निषेध व्यक्त केला होता. तरीही पुढे त्यांनी प्रत्येक टप्प्यावर स्वतःची राजकीय उपयुक्तता सिद्ध केली. राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडींनंतर ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सक्रिय झाले आणि त्या पक्षाकडून लोकसभेवर निवडून आले. सध्या उद्धव सेनेतील काही खासदारांच्या संभाव्य भूमिकांवर चर्चासुरू असताना वाकचौरे यांच्या नावाचीही चर्चा होत आहे. त्यांनी कोणती भूमिका घेणार, ते विद्यमान पक्षासोबत राहणार की नव्या राजकीय समीकरणांचा भाग होणार, याबाबत उत्सुकता कायम आहे. एकंदरीत, प्रशासकीय अधिकारी ते खासदार असा प्रवास करणारे भाऊसाहेब वाकचौरे पुन्हा एकदा राज्याच्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले असून त्यांच्या पुढील निर्णयाकडे शिर्डीसह राज्याचे लक्ष लागले आहे.

## ऑपरेशन टायगर...

फक्त या आमदार व खासदारांच्या पक्ष प्रवेशाची तारीख ठरायची आहे. उद्धव ठाकरेंच्या कार्यशैलीवर शिवसेना उबाठा पक्षातील आमदार, खासदार नाराज असल्याने ते शिवसेनेत प्रवेश करत आहे, असे कृपाल तुमाने यांनी म्हटले.

# वैजापूर आरटीओ हद्दीतील कारवाईवरून अधिकाऱ्यांत खडाजंगी; ऑडिओ क्लिप व्हायरल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हद्दीत झालेल्या वाहन तपासणी आणि दंडात्मक कारवाईवरून दोन आरटीओ अधिकाऱ्यांमध्ये दूरध्वनीवरून झालेली खडाजंगी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. या संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, त्यामध्ये एका निलंबित अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून वैजापूर हद्दीत कारवाई सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विशेष पथकाने वैजापूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात वाहनांवर कारवाई केली. यावर स्थानिक अधिकाऱ्यांनी आक्षेप घेत संबंधित पथकातील अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधला. यावेळी झालेल्या संभाषणात कार्यक्षेत्र, कारवाईचे अधिकार आणि स्थानिक कार्यालयाशी




समन्वय यावरून दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये वाद झाला.

व्हायरल क्लिपमध्ये स्थानिक अधिकारी पथकाला, "तुमचा आदेश संभाजीनगरसाठी आहे, वैजापूरसाठी नाही," असे सांगताना ऐकू येतात. त्यावर पथकातील अधिकारी "ही काही भारत-पाकिस्तानची सीमा नाही," असे उत्तर देताना ऐकू येतात. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांनी वैजापूर हद्दीत एका निलंबित अधिकाऱ्याकडून कथितपणे बोगस वसुली होत असल्याचाही आरोप केला आहे.

वसुलीच्या आरोपांनी खळबळ संभाषणादरम्यान वैजापूर हद्दीत काही वाहनधारकांकडून अवैध वसुली होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या आरोपांमुळे परिवहन विभागातील कार्यपद्धती आणि कारवाईच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणीही पुढे येत आहे.

मोटार वाहन निरीक्षकांचा खुलासा दरम्यान, वैजापूर कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक गणेश विघ्ने यांनी बोलताना व्हायरल ऑडिओमधील संभाषण आपलेच असल्याची कबुली दिली. "ही क्लिप सुमारे १० मिनिटे ९ सेकंदांची आहे. संपूर्ण संभाषण ऐकल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होईल. माझ्याकडे या संभाषणाची रेकॉर्डिंग उपलब्ध नाही. मात्र संबंधित कार्यक्षेत्रातील कार्यालयाला सूचना देणे आवश्यक असते. अहिल्यानगरच्या वाहन अधिकाऱ्यांनी वैजापूर कार्यालयाला माहिती देऊन बेकायदेशीर वाहनांवर कारवाई करावी, अशी आमची भूमिका आहे," असे विघ्ने यांनी स्पष्ट केले.

चौकशीकडे लक्ष व्हायरल ऑडिओ क्लिपमधील आरोपांचे गांभीर्य लक्षात घेता परिवहन विभाग याप्रकरणी चौकशी करणार का आणि कथित बोगस वसुलीबाबत सत्य काय आहे, याकडे वाहनधारकांसह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. विभागाकडून अधिकृत भूमिका समोर आल्यानंतरच या प्रकरणाचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर वर कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यातील डोणगाव शिवारात अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर वीरगाव पोलिसांनी रविवार ता.१४ रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास कारवाई केली.याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार वीरगाव पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक माने व पोलिस हवालदार भालेराव यांना गोपनीय माहिती मिळाली की, डोणगाव शिवारात एक विना क्रमांकाची ट्रॅक्टर ट्रॉली अवैधरीत्या वाळू वाहतूक करत आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता, तेथे एक विना क्रमांकाचे ट्रॅक्टर वाळूची वाहतूक करताना त्यांना दिसून आले. पथकाने चालकाकडे परवाना विचारला असता त्याच्याकडे कुठलाही परवाना मिळून आला नाही. पोलिसांनी साडेतीन लाख रुपये किमतीचे ट्रॅक्टर ट्रॉली व तीन हजार रुपये किमतीची वाळू असा ३ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणात वीरगाव पोलिसांत पोलिस उपनिरीक्षक प्रल्हाद माने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चालक रोहित गुंजाळ वय २० वर्षे राहणार पुणतांबा याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास हवालदार भालेराव हे करीत आहे.

# शेवगावच्या कोट्यवधींच्या टेंडरवर 'फिक्सिंग'चा आरोप?

## कंत्राटदाराला माघार घेण्यासाठी दबाव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : शेवगाव नगर परिषदेतील कोट्यवधी रुपयांच्या स्ट्रीट लाईट, सोलर हायमॅक्स व विद्युतीकरणाच्या कामांच्या निविदा प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. टेंडर विशिष्ट व्यक्तीच्या घशात घालण्यासाठी कंत्राटदारांवर दबाव टाकला जात असून, विरोध करणाऱ्यांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा खळबळजनक आरोप समोर आला आहे.

अहिल्यानगर येथील कंत्राटदार राजेंद्र रामदास शिंदे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या तक्रारीत शेवगाव नगर परिषदेतील निविदा प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचा आरोप केला आहे. शिंदे यांनी नियमानुसार ऑनलाईन टेंडर भरले असताना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी सादर करण्यात आलेली कागदपत्रे स्वीकारण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

तक्रारीनुसार, संबंधित टेंडर हे एका विशिष्ट नातेवाईकाला मिळावे यासाठी दबाव टाकण्यात आला. टेंडरमधून माघार घ्या, अन्यथा परिणाम भोगावे लागतील, अशी थेट धमकी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, या घटनेनंतर काही वेळातच स्वतःला पोलीस अधिकारी म्हणवणाऱ्या व्यक्तीकडून शिंदे यांना फोन आला. एका महिलेच्या छेडछाडीच्या कथित तक्रारीचा उल्लेख करून चौकशीची भाषा करण्यात आली. संबंधित महिला आपल्याला ओळखीचीही नसल्याचे शिंदे यांनी स्पष्ट करत, आपल्याला खोट्या गुन्ह्यात गोवून निविदा प्रक्रियेतून बाहेर काढण्याचा कट रचला जात असल्याची भीती व्यक्त केली आहे.

या तक्रारीनंतर शेवगाव नगर परिषदेतील टेंडर प्रक्रिया खरोखर पारदर्शक आहे का? राजकीय हस्तक्षेपामुळे स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेला हरताळ फासला जात आहे का? आणि कोट्यवधींच्या कामांमध्ये 'सेटिंग'साठी प्रशासनावर दबाव आणला जात आहे का? असे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली असून या आरोपांमुळे शेवगावच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. आता जिल्हा पोलीस प्रशासन या गंभीर आरोपांची कितपत दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमरधाममधून महिलेची कवटी गायब;

## अघोरी कृत्याच्या संशयाने खळबळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : शहरातील अमरधाम स्मशानभूमीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून दोन दिवसांपूर्वी अंत्यसंस्कार झालेल्या ५८ वर्षीय महिलेच्या चितेमधून कवटी आणि पायांचे काही अवशेष गायब झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. घटनास्थळी अघोरी पूजेशी संबंधित साहित्य आढळल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून नातेवाईकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हिंदू घिसाडी समाजातील एका ५८ वर्षीय महिलेचा डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला होता. दोन दिवसांपूर्वी अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते. समाजाच्या परंपरेनुसार तिसऱ्या दिवशी अस्थी संकलनाचा विधी केला जातो. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, अंत्यसंस्कारानंतर दुसऱ्या दिवशी स्मशानभूमीत भेट दिली असता चितेतील जळालेले अवशेष, हाडांचा ढाचा आणि कवटी जागेवर असल्याचे त्यांनी पाहिले होते. मात्र गुरुवारी सकाळी सावडण्याच्या विधीसाठी ते पुन्हा अमरधाममध्ये पोहोचले असता कवटी आणि पायांचे काही अवशेष गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.यावेळी चितेच्या परिसरात सायाळाचे काटे, कणकेच्या पिठाच्या बाहुल्या आणि लिंबू यांसारखे साहित्य आढळून आले. त्यामुळे अघोरी पूजा किंवा जादूटोण्याचा प्रकार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.या प्रकारामुळे संतप्त झालेल्या मृत महिलेच्या मुलासह नातेवाईकांनी तात्काळ श्रीगोंदा पोलीस ठाणे गाठून घटनेची माहिती दिली. संबंधित प्रकाराची चौकशी करून दोषींना शोधून काढण्याची मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान, स्मशानभूमीसारख्या पवित्र ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्येही संतापाची भावना व्यक्त होत आहे.



# भोकरला पालकमंत्री विखे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथे ना. डॉ . राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भोकरच्या लोकनियुक्त सरपंच शितलताई पटारे यांच्यावतीने जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना खाऊचे तसेच शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले . याप्रसंगी पंचायत समिती सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी भीटे, सरपंच शितलताई पटारे, सोसायटीचे चेअरमन किशोर मते, सतीश शेळके ,नंदकुमार कांगुणे ,राजेंद्र शेळके ,रामदास ढोकणे ,नवनाथ रोटे, मा उपसरपंच राजेन्द चौधरी, मा. चेअरमन राहुल अभंग ,शाळा व्यवस्थापन समितीचे रावसाहेब लोखंडे शाळा व्यवस्थापन समितीचे ऋषीकेश झिने, भाऊसाहेब डुकरे ,अहमद शेख, भानुदास तागड श्रीकांत अमोलिक, सुरेश पवार ,दादासाहेब साबळे आप्पासाहेब जाधव ,प्रताप पटारे आदी ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.




करांचा भरणा वेळेवर करा

स्त्री जन्माचे स्वागत करा. झाडे लावा झाडे जगवा

स्थापना ०६/०९/२०१६ फोन नंबर (०२४२७)२४१०४५

**नेवासा नगरपंचायत, नेवासा,**

नेवासा, ता. नेवासा (४१४६०३) जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

Email: co.newasagmail.com

न.पं. नेवासा/भांडार विभाग/ जा.क्र/८९१/२०२६

दिनांक : ११/०६/२०२६

**जाहीर वार्षिक निविदा सूचना (दुसरी वेळ)**

**सन २०२६-२०२७**

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | भांडार विभागासाठी स्टेशनरी साहित्य, संगणक व प्रिंटर संच देखभाल दुरुस्ती, चहा, नाश्ता, जेवण ई. सेवा पुरवणे. |
| २ | दुहेरी नोंद लेखा पद्धतीने लेख तयार करणे. |

टीप : वरील कामासंबधी माहिती, नियम व अटी नेवासा नगरपंचायत कार्यालयात दि. १५/०६/२०२६ पासून दि.२३/०६/२०२६ संध्याकाळी ५ वाजे पर्यंत उपलब्ध आहे.

शिक्का

**मुख्याधिकारी**

**नेवासा नागरापंचायत, नेवासा**


# राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचा वर्धापन दिन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या वतीने शहरातील राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या कार्यालयात पक्षाचा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत पक्षाच्या विचारधारेचा जागर केला तसेच आगामी काळात संघटन अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पक्षाच्या ध्वजाला वंदन करून राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक मजबूत होत असल्याचे सांगितले. तसेच जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी पक्ष नेहमीच कटिबद्ध राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष अमोल जगताप, तालुकाध्यक्ष कल्याण गायकवाड, वाल्मीक शिरसाठ, सुधीर माने, पुरुषोत्तम पठारे, संतोष काशीद, गौरव पवार, भागवत दहातोंडे, कृष्णा चव्हाण, बाळासाहेब कळसकर, मंगेश भनगे, तुकाराम सटाले, फारूक शेख, अण्णासाहेब पाठे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी पक्ष संघटन वाढीसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



# नागेबाबाच्या वतीने आयोजित नेत्र चिकित्सा शिबिरात १०० जणांची तपासणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

नेवासा : येथील पावन गणपती मंदिरासमोर असलेल्या नागेबाबा मल्टिस्टेट पतसंस्थेच्या नेवासा शाखेच्या १६ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित नेत्र चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सुमारे शंभर नेत्र रुग्णांची मोफत नेत्र चिकित्सा करण्यात आली.

नागेबाबा मल्टिस्टेट नेवासा शाखेच्या १६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पानसुपारी सोहळ्यास संस्थापक अध्यक्ष कडूभाऊ काळे, नेवासा शाखाधिकारी गणेश वायकर,एरिया ऑफिसर एकनाथ नांदे, समन्वयक भरत दारूंटे यांनी आलेल्या सभासद हितचिंतक मित्र परिवाराचे विचारधन पुस्तिका देऊन स्वागत केले.

यावेळी नागेबाबा मल्टिस्टेटच्या प्रांगणातच सकाळी ९ ते ३ यावेळेत मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन अहिल्यानगर येथील आनंदऋषी हॉस्पिटलच्या विशेष सहकार्यातून करण्यात आले होते.



याप्रसंगी नागेबाबा परिवाराचे प्रमुख कडुभाऊ काळे, महाव्यवस्थापक भरत दारूंटे,क्षेत्र विकास अधिकारी एकनाथ नांदे,शाखाधिकारी गणेश वायकर, अभिषेक नांगरे,सचिन मुंडे,तेजस दुर्शिंग, प्रतिभा पागिरे, वैशाली ताठे यांनी उत्कृष्ट नियोजन शिबिरासाठी केले होते.

## निधन वार्ता

### नानासाहेब होले



**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक नानासाहेब भिकाजी होले (वय ६९) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, अनिकेत व अभिजित ही दोन मुले तसेच राधाकिसन आणि बाळासाहेब होले हे दोन मोठे भाऊ असा परिवार आहे.

## निधन वार्ता

### सरला सोमाणी



**श्रीरामपूर** : येथील गुरूमाऊली पतसंस्थेचे अध्यक्ष व बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव शरद रामविलास सोमाणी यांच्या पत्नी सरला शरद सोमाणी (वय ७०) यांचे रविवार, दि. १४ जून रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, एक मुलगी, सुन, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रेमसुख, डॉ. मदन सोमाणी व प्रकाश सोमाणी यांच्या भावजयी, फिजीओथेरापिस्ट डॉ. विजय सोमाणी यांच्या मातोश्री, डॉ. आशिष सोमाणी, अमित, अतुल व उमेश सोमाणी यांच्या त्या चुलती होत.

### आदर्श शिक्षिका अनिता गायकवाड



**नेवासा** : नेवासा फाटा मुकींदपूर येथील कडा कॉलनी शाळेतील आदर्श शिक्षिका अनिता गायकवाड (वय ४९) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले. यांच्या पश्चात दोन मुली व एक जावई असा परिवार आहे. धनश्री मुठे व ऋचा शशिकांत डमाळे नेवासा बुद्रुक यांच्या त्या मातोश्री तर विराज मुठे यांच्या त्या सासू होत.

# स्कोडा ऑटोची नवीन कोडियाक आरएस एसयूव्ही लॉन्चिंगची घोषणा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक** : स्कोडा ऑटो इंडिया आपल्या उच्च-कार्यक्षमता असलेल्या आरएस पोर्टफोलिओला नवीन कोडियाक आरएस च्या माध्यमातून अधिक बळकट करण्यासाठी सज्ज आहे. ५० वर्षांहून अधिक जुन्या आरएस वारशावर आणि १२५ वर्षांपेक्षा अधिकच्या मोटरस्पोर्ट परंपरेवर आधारित हे नवीन मॉडेल ब्रँडच्या परफॉर्मन्स डीएनए ला अधिक ठळकपणे अधोरेखित करते. २२ जून २०२६ पासून बुकिंगसाठी उपलब्ध होणारी कोडियाक आरएस दमदार परफॉर्मन्स, वैशिष्ट्यपूर्ण मोटरस्पोर्ट कॅरेक्टर, सात-सीटर लक्झरीची बहुपयोगिता आणि ४४ तंत्रज्ञानासह अधिक सक्षम ऑल-टेरेन क्षमता यांचे उत्कृष्ट संयोजन सादर करते. या घोषणेबाबत बोलताना स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, आरएस बॅज हा ५० वर्षांहून अधिकच्या जागतिक परफॉर्मन्स वारशाचे प्रतीक आहे आणि दोन दशकांपूर्वी ऑक्टाव्हिया आरएस भारतात दाखल झाल्यापासून याला देशात मोठा आणि निष्ठावान चाहतावर्ग लाभला आहे. गेल्या वर्षी लॉंच झालेली नवीन ऑक्टाव्हिया आरएस केवळ २० मिनिटांत पूर्णपणे विकली गेली, ज्यामुळे ऑटोमोबाईल उत्साही ग्राहकांमध्ये तिची विशेष लोकप्रियता अधोरेखित झाली. आता आम्ही हा वारसा कोडियाक आरएस च्या माध्यमातून पुढे नेत आहोत. भारतात प्रतिष्ठित आरएस बॅज धारण करणारी ही आमची पहिली सात-सीटर असून देशातील आतापर्यंतची सर्वात वेगवान स्कोडा देखील आहे. ही परफॉर्मन्स,

**बुकिंग २२ जून पासून**

प्रशस्त जागा आणि ४४ क्षमतेला आमच्या रेसिंग डीएनए च्या दमदार ओळखीशी जोडते.

कोडियाक आरएस: परफॉर्मन्स हीच ओळख आरएस बॅज म्हणजे रॅली स्पोर्ट, जो स्कोडा ऑटोच्या परफॉर्मन्स इंजिनीअरिंगप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. जागतिक स्तरावर आरएस मॉडेल्स त्यांच्या डायनॅमिक क्षमता, अचूकता आणि रोमांचक ड्रायव्हिंग अनुभवासाठी ओळखले जातात. कोडियाक आरएस च्या माध्यमातून हे तत्त्वज्ञान आता भारतातील लक्झरी एसयूव्ही सेगमेंटमध्ये प्रवेश करत असून बहुपयोगी आणि



ऑल-टेरेन क्षमतांनी सज्ज अशा पॅकेजमध्ये अधिक शार्प आणि रोमांचक ड्रायव्हिंग अनुभव प्रदान करते. कोडियाक आरएस ब्रँडच्या 'डिफरेंशिएशन' या महत्त्वाच्या धोरणात्मक स्तंभालाही अधोरेखित करते आणि प्रत्येक आकांक्षेला साजेशी एसयूव्ही सादर करून आपल्या पोर्टफोलिओला अधिक मजबूत बनवते.

स्कोडाचा रेसिंग डीएनए

मोटरस्पोर्ट हे शतकाहून अधिक काळ स्कोडा ऑटोच्या ओळखीचा अविभाज्य भाग राहिले आहे. कायलॅक, कुशाक आणि स्लाव्हिया पासून कोडियाक आणि मर्यादित संख्येत उपलब्ध असलेल्या ऑक्टाव्हिया आरएस पर्यंत ब्रँडच्या संपूर्ण कार ताफ्याने 'एका उत्पादकाकडून सर्किटवर सर्वात वेगवान मल्टी-कार रिले' हा इंडिया आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड आपल्या नावावर केला. चालक बदलण्यासाठी लागलेला वेळ धरून या पाचही कार्सनी कोयंबतूर येथील सीओएएसटीटी +ट्रॅकवर एकूण १२:३०.९७ मिनिटांचा लॅप टाइम नोंदवला. यासोबतच ब्रँडने 'ग्रेटेस्ट ऑन अ ट्रॅक इज अ स्कोडा ऑन अ ट्रॅक' ही मोहीमही सुरू केली, ज्यामध्ये त्यांच्या संपूर्ण प्रोडक्ट पोर्टफोलिओमधील इंजिनीअरिंग क्षमता आणि दमदार डायनॅमिक परफॉर्मन्सचे प्रदर्शन करण्यात आले. कोडियाक आरएस ही एसयूव्ही लाइन-अपमधील या तत्त्वज्ञानाची सर्वोच्च अभिव्यक्ती असून ब्रँडचे मोटरस्पोर्ट डीएनए, परफॉर्मन्स इंजिनीअरिंग आणि ऑल-टेरेन क्षमता यांना अत्यंत प्रभावी स्वरूपात एकत्र आणते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि . १६ जून २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-६ | १५० १६९ ६०० | ५९-१६-३२-८०-६४ |

### कल्याण

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९ २८९ २२५ | २-९ | १२८ ४५० ११७ | २१-८९-०३-७५-९६ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| २७० २८९ २२५ | ९-५ | १४० २३० ७८० | ९०-४५-१३-२६-५७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 1 | | | | |

द • ख • ल

## गदेवाडी शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या थाटामाटात संपन्न



**चापडगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गदेवाडी येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची ट्रॅक्टर-ट्रॉलीतून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या अग्रभागी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक लेझीम नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीत गावातील मान्यवर ग्रामस्थ, पालक, शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गावातील विविध ठिकाणी नागरिकांनी विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. मिरवणूक शाळेत पोहोचल्यानंतर इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, शालेय गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावर्षीचा प्रवेशोत्सव एका विशेष बाबीमुळे अधिक चर्चेत राहिला. इयत्ता दुसरी ते सातवीमधील तब्बल ३० विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यम सोडून गदेवाडी शाळेत प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाळेत सत्कार करण्यात आला. यावेळी पालकांनी शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विश्वास व्यक्त करत आपल्या पाल्यांचा प्रवेश येथे घेतल्याचे सांगितले. मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी पालकांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. मागील वर्षभरात शाळेत राबविण्यात आलेले विविध शैक्षणिक व उपक्रमशील कार्य, विद्यार्थ्यांची प्रगती आणि शाळेचे सकारात्मक वातावरण याबाबत पालकांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे आजी-माजी अध्यक्ष व सदस्य, ग्रामपंचायतीचे आजी-माजी सरपंच व उपसरपंच, सोसायटीचे आजी-माजी चेअरमन व व्हाइस चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळेत बालगोपाळांचे स्वागत



**ढोरजळगाव :** शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव परिसरातील जिल्हा परिषद शाळेमध्ये इ.१ ली मध्ये नव्याने प्रविष्ट झालेल्या नवगत बालगोपाळांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. ढोरजळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी रांगोळी व फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. प्रत्येक विद्यार्थ्याचे औक्षण करून पुष्पवृष्टी करण्यात आली. त्याचबरोबर ढोरजळगाव ने , बडे वस्ती, नाकाडे वस्ती, गरडवाडी, मलकापूर, येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत देखील विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.यावेळी ढोरजळगाव शे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पाटेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे विषय तज्ञ देविदास खडके, माजी अध्यक्ष भाऊसाहेब अकोलकर, डॉ. सुधाकर लांडे, अरुण साबळे, ज्ञानेश्वर फसले, सुरेश गिऱ्हे, सुचित पाटेकर,लक्ष्मण लांडे,अनिल अकोलकर, निलेश गिऱ्हे,गणेश पाटेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संपत तुतारे, सूत्रसंचालन शिक्षक संतोष काळे, तर आभार शिक्षिका अर्चना नजन यांनी मानले.

## अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांचे बाबूशेठ टायरवाले यांनी केले सांत्वन



**शेवगाव :** शहरातील इंदिरानगर परिसरातील अल्पवयीन मुलीच्या मृत्यूच्या घटनेनंतर शिवसेना जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले यांनी संबंधित कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले असल्याची माहिती शिवसेनेच्या प्रसिद्धीपत्रकात देण्यात आली आहे. प्रसिद्धीपत्रकानुसार, या प्रकरणात पोलिसांनी एका सोहेल राजू शेख यांस अटक केली असून घटनेचा तपास सुरू आहे. कुटुंबीयांनी आपल्या भावना व्यक्त करताना मुलीला विविध प्रकारचा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप केला असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. यावेळी बाबूशेठ टायरवाले यांनी संबंधित प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच महिलांच्या व अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रकरणांमध्ये कोणतीही हयगय होऊ नये, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख दिलीप भागवत, शहरप्रमुख मनोज राऊत, ज्येष्ठ नेते एकनाथ कुसळकर, नगरसेवक रोहित काथवटे, जिल्हा संघटक आजिनाथ सुडके यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या घरी केला ‘प्रवेश महोत्सव’

### अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या रिमांड होम केंद्रांतर्गत एका विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेद्वारे केंद्र स्तर शिक्षकांनी व मार्कंडेय माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांनी थेट विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचून प्रवेश महोत्सव साजरा केला, तसेच शाळेत नवीन प्रवेश देखील निश्चित केले.

रिमांड होम केंद्रातील केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे, रामेश्वर ढगे, मार्कंडेय माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संदीप छिंदम, निलेश आनंदास यांनी एका दिव्यांग विद्यार्थ्याच्या घरी जाऊन त्याचे पुष्पगुच्छ देऊन अत्यंत उत्साहात स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्याची भेट देण्यात आली. केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी या मुलाशी आपुलकीने संवाद साधला. तसेच पालकांशी चर्चा करताना त्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे योग्य समुपदेशन केले व शासनाकडून मिळणाऱ्या विविध सोयी-सुविधांची सविस्तर माहिती दिली. मुख्याध्यापक संदीप छिंदम यांनी पालकांना आपल्या पाल्याला नियमित शाळेत पाठवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले. रिमांड होम केंद्रातील दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी विशेष शिक्षक उमेश शिंदे आणि रामेश्वर ढगे यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांतून काही दिव्यांग विद्यार्थ्यांचे ‘शारदा विद्या मंदिर’ मध्ये यशस्वीरित्या प्रवेश करण्यात आले. शाळेत प्रवेशावेळी मुख्याध्यापिका भक्ती पुराणिक यांनी या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांचा पुढील अभ्यासक्रम सुकर व्हावा याकरिता त्यांना शाळेच्या वतीने पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

## महिलेचा विनयभंग; दोघे गजाआड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** एका २८ वर्षीय विवाहित महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुन्सिपल कॉलनी परिसरातील सिद्धार्थ नगर येथे ही घटना घडली. पीडित महिलेच्या घरासमोरील मोकळ्या जागेत लज्जा उत्पन्न होईल अशी अश्लील वस्तू टाकून तिचा विनयभंग करण्यात आला. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोघांना अटक केली आहे.

विनोद मधुकर त्रिभुवन (वय ४३) आणि हर्ष सुनील शेलार (वय १८) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत, तर तनीष गोपाल गुजर याच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे. तिघेही मुन्सिपल कॉलनी, सिद्धार्थ नगर येथील रहिवासी आहेत. पीडित महिला कुटुंबासह रात्री झोपलेली असताना मुख्य आरोपी विनोद त्रिभुवन याच्या सांगण्यावरून हर्ष शेलार आणि तनीष गुजर यांनी तिच्या घरासमोर एक मोरपंखी रंगाचा बॉक्स आणून टाकला. या बॉक्सला खाकी रंगाची चिकटपट्टी लावलेली होती आणि त्यात लज्जा उत्पन्न होईल असे अश्लील साहित्य ठेवून आरोपींनी विनयभंग केला. याबाबत पीडितेने तोफखाना ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरूद्ध गुन्ह्याची नोंद केली असून दोघांना अटक केली आहे. पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी पदभार घेताच प्रलंबित गुन्हे उघडकीस आणण्याची मोहीम राबवली आहे. या आव्हानात्मक गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासले आणि आरोपींना बेड्या ठोकल्या.

पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण या पुढील तपास करत आहेत. तसेच तपासी अंमलदार सहाय्यक फौजदार गोपीनाथ गोरडे, पोलीस हवालदार नितीन उगलमुगले, भानुदास खेडकर, सुजय हिवाळे, सुमित गवळी आणि सतीश त्रिभुवन यांनी या गुन्ह्याचा छडा लावला.

## सभापती राम शिंदे यांचे ‘लेक-जावई’ धोंडे जेवण



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगाव चौंडी येथे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आयोजित केलेल्या धोंडे जेवन सोहळ्याचे एखाद्या गावाने गावच्या लेक जावाई साठी जेवणाचा सोहळा आयोजित करण्याची ही राज्यातील पहिलीच घटना असल्याने तिचे आयोजन करणारे सभापती शिंदे राज्यभरातील ७०० वर लेक जावाई कडून कौतुक मिळून गेले

प्रत्येकाच्या आयुष्यात एक कुटुंब असते सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे, निस्वार्थ प्रेम करणारे आणि कितीही वादळे आली तरी साथ न सोडणारे. पण आयुष्याच्या धावपळीत कधी कधी आपण आपल्या माणसांपासून नकळत दूर जातो. अशा वेळी आपल्या परंपरा, सण आणि संस्कार पुन्हा एकदा मनांना जवळ आणण्याचे आणि नाती अधिक दृढ करण्याचे काम सभापती शिंदे करतात.

माझ्यासाठी कुटुंब म्हणजे केवळ चार भिंतींचे घर नव्हे कुटुंब म्हणजे माझे गाव, कुटुंब म्हणजे माझे कर्जत-जामखेड, कुटुंब म्हणजे माझ्या वारशाशी नाळ जोडलेले आपले अहिल्यानगर, कुटुंब म्हणजे आपला महाराष्ट्र आणि कुटुंब म्हणजेच आपले राष्ट्र. जिथे जिथे माझ्या या कुटुंबाला माझी गरज भासेल, तिथे तिथे मी सदैव त्यांच्या सेवेसाठी उभा राहीन, हीच माझी बांधिलकी आहे आसे मत सभापती प्रा राम शिंदे यांनी धोंडेजेवण या गोड कार्यक्रमाच्या वेळी म्हणाले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आणि अधिक मासानिमित्त आयोजित धोंडेजेवण व लेक-जावई सन्मान सोहळ्याच्या निमित्ताने जामखेड तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ चौंडी नगरीत पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या निनादात, फुगडी आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी सजलेली भव्य स्वागत मिरवणूक उत्साहात पार पडली.

मिरवणुकीनंतर गावच्या लेक-जावयांसमवेत श्री अहिल्येश्वराचे मनोभावे दर्शन घेतले. त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकास अभिवादन करून त्यांच्या कार्याला आणि विचारांना विनम्र अभिवादन केले. केली तसेच आज या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती आसल्याने चौंडी नगरी दुमदुमून गेले होती.

## विकासकामे करणारा अनिल बोरुडे : आ. जगताप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** माजी सभापती पुष्पाताई बोरुडे यांनी विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांचा विश्वास जिंकला आहे. तर माजी उपमहापौर अनिल बोरुडे हे नागरिकांच्या मनातील विकासकामे करणारे ‘लाडके भाऊ’ म्हणून संपूर्ण प्रभागात ओळखले जातात. विकासासाठी त्यांची तळमळ आणि नागरिकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते हेच त्यांच्या लोकप्रियतेचे कारण आहे. असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

मनपा प्रभाग क्रमांक ७ मधील बालिकाश्रम रोड, बोरुडे मळा परिसरात नगरसेविका पुष्पा अनिल बोरुडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून सुमारे दोन कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला. आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते या विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी महापौर ज्योती गाडे, बाबासाहेब वाकळे, संपत बारस्कर, अनिल बोरुडे, पुष्पा बोरुडे, उपसभापती वर्षा सानप, दगडू पवार, रवींद्र बारस्कर, नगरसेवक करण कराळे, महेश लोंढे, पुष्कर कुलकर्णी, रेवन्नाथ पवार, नगरसेविका वंदना ताठे, प्रदीप बोरुडे, रत्नाकर कुलकर्णी, पद्माताई बोरुडे, योगेश गोंधळे, स्वप्नील बोरुडे, गोरख बोरुडे, अश्विनी बोरुडे, नंदकुमार बोरुडे, साई बोरुडे, शरद बोरुडे गौरव बोरुडे ओंकार बोरुडे यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, शहरात गेल्या पंधरा वर्षांपूर्वी बालिकाश्रम रोड हा पहिला काँक्रीटचा रस्ता निर्माण झाला होता. आज त्याच धर्तीवर संपूर्ण शहरामध्ये दर्जेदार, टिकाऊ आणि नियोजनबद्ध काँक्रीट रस्त्यांचे जाळे उभे राहत आहे. पूर्वी हा परिसर केवळ निवासी भाग म्हणून ओळखला जात होता, मात्र रस्त्यांच्या विकासामुळे येथे व्यवसाय वाढला, बाजारपेठ निर्माण झाली आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, मी महापौर झाल्यापासून बोरुडे मळा परिसरात विविध कार्यक्रमांसाठी अनेकदा आले आहे. पुष्पाताई बोरुडे या विकासकामांबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून नागरिकांना एकत्र आणण्याचे काम करतात. विकासकामांमुळे या परिसराचा मोठ्या प्रमाणात कायापालट झाला आहे.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, संपत बारस्कर, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## पोलीस अधीक्षक साहेब, श्रीगोंद्यात नेमकं चाललंय काय?

### मुद्देमाल प्रकरणांनी वाढवले गुढ

दादा सोनवने। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पोलिसांच्या मुद्देमाल व्यवस्थापनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काही दिवसांपूर्वी तोफखाना पोलीस ठाण्यातील जप्त मुद्देमालातील एमडी ड्रग्ज गायब झाल्याची आणि त्याची विक्री झाल्याची चर्चा जिल्हाभर रंगली होती. या प्रकरणाची चर्चा अद्याप सुरू असतानाच आता श्रीगोंदा पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेला गुटखा विकल्याचा प्रकार समोर आल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

अहमदनगर (अहिल्यानगर) पोलीस मुख्यालयातील मुद्देमाल कक्षातून तब्बल २५ कोटी रुपयांचे (१० किलो) एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज चोरीला गेल्याची आणि त्याऐवजी मैदा भरल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या श्यामसुंदर गुजर या पोलीस कर्मचाऱ्यासह एका टोळीला अटक करण्यात आली होती याचा धर्तीवर आता श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल कक्षातील गुटखा पुन्हा विक्री प्रकरणी चौकशी सुरू असून, या घटनेमुळे जप्त करण्यात आलेल्या इतर मुद्देमालाच्या सुरक्षेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. गुटखा सापडला, मात्र मुद्देमालातील इतर वस्तू सुरक्षित आहेत का, याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमधील मुद्देमालाची तपासणी करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.या घटनेनंतर श्रीगोंदा शहरात आणि तालुक्यात विविध चर्चांना उधाण आले आहे. केलं एकाने आणि फेडायची वेळ दुसऱ्यावर आली अशी चर्चा सर्वत्र ऐकायला मिळत असून, वास्तविक जबाबदारी कोणाची आणि कारवाई कोणावर होणार याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.

**एकमेकांवर शंका**

श्रीगोंदा पोलीस ठाण्यातून पकडलेला गुटखा पुन्हा विक्रेत्याकडे सापडल्याने खळबळ उडाली असून हे नेमके कोणी केले यासाठी श्रीगोंदा पोलिसासह नागरिक एकमेकांवर शंका घेताना दिसत आहेत त्यामुळे गंगाधर हि शक्तिमान आहे पण तो कोण याबाबत अनेक चर्चांना उधाण आले आहे.

**वरिष्ठ चौकशी करून कारवाई करतील : पो.नि. संजय ठेंगे**

श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल कक्षातून गुटखा विक्रत्याकडे सापडल्याच्या प्रकरणात नेमके कोण दोषी आहे याबाबत वरिष्ठ स्तरावरून चौकशी सुरु असून चौकशी झाल्यावर वरिष्ठाकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल असेही श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी बोलताना सांगितले आहे.

## फोटो काढल्याच्या संशयावरून तरुणांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील ऐतिहासिक फरियाबाग परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या तरुणांवर तीन अनोळखी व्यक्तींनी लोखंडी कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. फिर्यादी रेहान असिफ खान (वय १७, रा. कामाठीपुरा, झेंडीगेट) हा आपल्या मित्रांसह फरियाबाग येथे गेला होता. त्या ठिकाणी तीन अनोळखी तरुण दारू पीत बसले होते. आपण दारू पीत असताना रेहान आणि त्याचे मित्र आपले फोटो काढत आहेत, असा गैरसमज या तीन अनोळखी आरोपींनी करून घेतला.

याच कारणावरून आरोपींनी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यांनी रेहान आणि त्याच्या मित्रांना अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. हा वाद एवढ्या विकोपाला गेला की, आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने उमर खान या तरुणाच्या डोक्यावर आणि फैजअली तांबोळी याच्या डाव्या हाताच्या पंजावर लोखंडी कोयत्याने गंभीर वार केले. या हल्ल्यात दोघेही तरुण गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी तातडीने अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर रेहान खान याने कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार येथे आरोपींविरोधात तक्रार दिली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पवार करत असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या ९४ विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातही विद्यार्थी शासकीय सेवेत भरती करण्याची सुवर्ण परंपरा कायम राखली असून या वर्षी तब्बल ९४ विद्यार्थ्यांची पोलीस, आर्मी व इतर शासकीय सेवेत निवड झाली. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना दर्जेदार उच्चशिक्षण मिळून त्यांनाही नोकरीच्या संधी मिळाव्यात ही दुरदृष्टी ठेऊन ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माजी आमदार बाबूजी आव्हाड यांनी या महाविद्यालयाची स्थापना केली. हे महाविद्यालय ग्रामीण भागातील उसतोडणी कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणाबरोबरच त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणारे गावपातळीवरील विद्यापीठ ठरत आहे.

> गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात मागील १५ वर्षांपासून सुरु करण्यात आलेले स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व करिअर कट्टा विद्यार्थ्यांसाठी निशुल्क सोईसुविधा पुरवीत आहे. स्पर्धा परीक्षा केंद्र, भव्य क्रीडांगण तसेच सुयोग्य मार्गदर्शन या आधारे संपूर्ण महाराष्ट्रात दरवर्षी इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी दृढनिश्चय व कठोर परिश्रमाच्या बळावर पोलीस, आर्मी तसेच इतर शासकीय सेवेत भरती होतात.
>
> **प्रो. डॉ. बबन चौरे**
> **प्राचार्य, बाबूजी आव्हाड महाविद्यालय**

गेल्या १५ वर्षात महाविद्यालयाच्या ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, करिअर कट्टा, भव्य क्रीडांगणाचा व पुरविण्यात आलेल्या मोफत क्रीडा सोईसुविधांचा वापर करून ५००० पेक्षा जास्त विद्यार्थी पोलीस दल, आर्मी, एमपीएससी तसेच इतर शासकीय सेवेत भरती झाले आहेत.

दिवसभर अभ्यासिकेत अभ्यास, महाविद्यालया कडून मिळणाऱ्या वैयक्तिक मार्गदर्शनाबरोबरच पुरविलेल्या प्रश्नसंचांचा सराव व क्रिडांगणावर शारीरिक चाचणीची तयारी करून विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. यावर्षी पोलीस व खात्यांतर्गत पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत ५६, भारतीय सैन्यदलात ३१, विविध शासकीय अस्थापनात ०५ तर सेट-नेट परीक्षेत ०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

> बाबूजी आव्हाड महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्यास तसेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यास प्रोत्साहित केले जाते. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच विद्यार्थी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध शासकीय सेवेत भरती व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयात विद्यार्थी घडविण्याचे काम केले जाते.
>
> **अभय आव्हाड**
> **अध्यक्ष, पार्थ विद्या प्रसारक मंडळ**

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, तथा पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून व प्राचार्य डॉ बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राबरोबरच ग्रंथालयात स्पर्धा परीक्षाविषयक पुस्तकांची व मासिकांची उपलब्धता, तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांना धावण्यासाठी ४०० मी. ट्रॅक, इनडोअर स्टेडियम, गोळाफेक व उंचउडीसाठी स्वतंत्र मैदान इत्यादी सुविधा निशुल्क पुरविण्यात येतात. . स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात अभ्यास करत असताना आर्थिक अडचणींबरोबरच ठराविक कालावधीत पदभरतीची जाहिरात न आल्यास तसेच वाढत्या वयाच्या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे अनेक विद्यार्थी नैराश्य येते, अशा वेळी महाविद्यालय त्यांचे समुपदेशन करण्याबरोबरच त्यांना आर्थिक मदतही करते. त्यामुळे कित्येक विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची नवी उमेद मिळून ते तीनचार वर्षाच्या अथक प्रयत्नातून पोलीस व भारतीय सैन्यदलात भरती होतात. या साठी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा समन्वयक डॉ. किरण गुलदगड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, विद्यार्थी समुपदेशक डॉ. अभिमन्यू ढोरमारे, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे यांचे मार्गदर्शन लाभले.

**महाराष्ट्र शासन**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय,कर्जत ता. कर्जत जि. अहिल्यानगर**

E-mail- tahasildarkarjatgmail.com    दूरध्वनी क्रमांक - ०२४८९-२२२३२६

जा.क्र./जन्म मृत्यु १५२/२०२६    दि.३/०६/२०२६

प्रति,
पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कर्जत/
विषय- जन्म नोंद मिळाल्याबाबतच्या अर्जाची स्थानिक चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत
संदर्भ- शासन निर्णय क्र.जम्रूनों.२५२५/(ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/ कु.क मंत्रालय मुंबई दि.१२ मार्च २०२५

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, अर्जदार श्री. / श्रीम भारत रामभाऊ शिंदे रा. खातगाव ता. कर्जत जि.अहिल्यानगर यांनी आई नामे श्री/ श्रीम. सिताबाई रामभाऊ शिंदे यांचा जन्म/ मृत्यू नोंद दाखला मिळण्याबाबत इकडेस अर्ज सादर केलेला आहे. सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू मौजे खातगाव ता. कर्जत जी. अहिल्यानगर येथे झालेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने सदर्भीय शासन निर्णयात नमूद केले प्रमाणे सदर अर्जदाराच्या स्थानिक जन्माच्या ठिकाणचा व रहिवासाचा तपास करून संबंधित पोलीस विभागाकडून सदर बाबत अहवाल मागविण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने श्री/श्रीम/कु. भारत रामभाऊ शिंदे रा. खातगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांचा स्थानिक जन्माच्या/मृत्यूच्या ठिकाणचा व रहिवास्याचा आपल्या स्तरावर स्थानिक चौकशी करून आपले स्वयंस्पस्ट अभिप्रायासह अहवाल आठ दिवसात इकडेस सादर करावा.

सही
(राव सतवन)
तहसिलदार कर्जत

# अट्टल चोरट्याला तरुणांनी सापळा रचून पकडले ; तीन चोरटे फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** अवसरी खुर्द ता. आंबेगाव येथील खेडकर मळा परिसरात अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या वीजवाहक तारा चोरीच्या घटनांना अखेर धाडसी सापळ्यामुळे आळा बसला आहे. ठेकेदार मयूर खेडकर यांनी मित्रांच्या मदतीने रचलेल्या सापळ्यात एका अट्टल चोरट्याला रंगेहात पकडून मंचर पोलिसांच्या ताब्यात दिले, तर त्याचे तीन साथीदार अंधाराचा फायदा घेत पसार झाले. मिळालेल्या माहितीनुसार, खेडकर मळा परिसरात अज्ञात चोरटे वारंवार वीजवाहक तारा चोरी करत होते. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या मयूर खेडकर यांनी संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये चार जण वीजवाहक तारा चोरत असल्याचे स्पष्ट दिसून आले. काही दिवसांपूर्वी या चोरट्यांनी वीजवाहक तारा तोडून जवळील शेतातील टॉवरशेजारी कट करून लपवून ठेवल्या होत्या. चार-पाच दिवसांनी त्या नेण्यासाठी चोरटे परत येतील, असा अंदाज बांधून मयूर खेडकर आणि त्यांच्या मित्रांनी सापळा रचला. १२ जूनच्या रात्री त्यांनी परिसरात पाळत ठेवली. नेहमीप्रमाणे चोरी केलेल्या तारा घेण्यासाठी चोरटे घटनास्थळी येताच झाडावर दबा धरून बसलेल्या मयूर खेडकर यांनी एका चोरट्यावर झडप घालून त्याला पकडले. मात्र, इतर तीन चोरटे घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाले. पकडलेल्या आरोपीला तत्काळ मंचर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपी हा अट्टल चोर असून त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्याने अनेक ठिकाणी अशाच प्रकारच्या चोरी केल्याची माहितीही समोर आली आहे. दरम्यान, मयूर खेडकर यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता चोरट्याला पकडल्याने ग्रामस्थांसह पोलिसांकडून त्यांच्या धाडसाचे कौतुक करण्यात येत आहे. या टोळीने यापूर्वीही मयूर खेडकर यांच्या मालकीच्या सुमारे दोन टन वीजवाहक तारा चोरी केल्या असून त्यामध्ये जवळपास आठ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील उर्वरित आरोपींना अटक करून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करावा, अशी मागणी मयूर खेडकर यांनी पोलिसांकडे केली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत असल्याची माहिती मिळाली आहे.



अवसरी खुर्द ता. आंबेगाव खेडकरमळा येथील ठेकेदार मयुर खेडकर यांच्या तारांचे चोरटयांनी केलेले नुकसान. कोपऱ्यात चोरटा

# पाच वर्षापासून पोलिसांना गुंगारा देणारा जेरबंद

## शिक्रापूर पोलिसांच्या पथकाची धडाकेबाज कारवाई



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पोलीस स्टेशन मध्ये जुलै २०२१ मध्ये दाखल असलेल्या गुटखा तस्करी प्रकरणातील फरार आरोपीला जेरबंद करण्यात शिक्रापूर पोलिसांच्या पथकाला पाच वर्षांनी यश आले असून रोजी बापू उर्फ प्रवीण शंकर गवते असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या फरार आरोपीचे नाव आहे. शिक्रापूर (ता. शिरूर) येथील भारत गॅस फाटा येथे ९ जुलै २०२१ रोजी काही वाहनांमधून गुटखा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती तत्कालीन पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांना मिळाली होती, त्यानंतर पोलीस हवालदार सचिन मोरे, पोलीस नाईक अमोल दांडगे, शिवाजी चितारे, सागर कोंढाळकर, अशोक केदार यांनी भारत गॅस कंपनी परिसरात साध्या वेशात सापळा रचला असता तीन वाहनांमधून गुटखा विक्रीसाठी आल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस वाहन चालकांना थांबवत असताना तीन वाहनांमधील काही युवक पळून गेले होते, दरम्यान पोलिसांनी एम एच १४ एच यु ३०२१, एम एच ०४ एच डी ६७७८ व एम एच १४ ई एम ५१२८ ही तीन वाहने तसेच तब्बल ७८ लाख रुपयांचा गुटखा साठा जप्त केला होता, तर याबाबत पोलीस हवलदार सचिन अंकुश मोरे (रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी तिघांना अटक करत तब्बल बारा जणांवर गुन्हा दाखल केला होता, त्यानंतर काही फरार आरोपींना देखील अटक केली होती, मात्र गुन्हा दाखल झाल्यापासून बापू उर्फ प्रवीण गवते हा पोलिसांना गुंगारा देत होता, तर बापू हा चाकण परिसरात असल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, पोलीस हवालदार गणेश येळवंडे, नवनाथ केंद्रे, मयूर कुंभार यांनी चाकण परिसरात जाऊन बापू उर्फ प्रवीण शंकर गवते (वय २२ वर्षे रा. गवते वस्ती, चाकण, ता. खेड जि. पुणे) याला अटक केली, तर आरोपीला न्यायलयात हजर केले असता न्यायालयाने त्याची रवानगी येरवडा कारागृहात केली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख हे करत आहे.

# चिमुकल्यांच्या उत्साही प्रवेशाने गजबजल्या शाळेच्या वर्ग खोल्या

## आज पासून वाजली शाळेची घंटा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** उन्हाळ्याची सुट्टी संपून सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ आज सोमवार दिनांक १५ जून रोजी झाला असुन सर्वत्र विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करत शालेय प्रवेश झाला आहे. आज सगळीकडे वर्गखोल्या चिमुकल्यानी गजबजल्या आहेत.अनेक ठिकाणी रडणारी मुले,काही ठिकाणी नटून थटून मोठ्या उत्साहात आलेली बाल विद्यार्थी, कोठे पालकांची मुलांना शाळेत घेऊन यायची धांदल, शिक्षकांकडून होणारे स्वागत, पालक व ग्रामस्थांची हजेरी यामुळे शाळेचा परिसर आनंदी झाला असल्याचे चित्र पाहावयास मिळाले

पुरंदर तालुक्यातील हिवरे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत ''पहिलं पाऊल '' हा विदयार्थ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम ढोल तश्याच्या गजरात उत्साहात साजरा करण्यात आला. छोट्या मुलांचे पाय ताटातील कुंकवात बुडवून त्यांचे ठसे कागदावर उमटवून अनोखे स्वागत करण्यात आले.सर्व मुलांना गणवेश, शालेय साहित्य, खाऊ, गुलाबांची फुले व पोषण आहार देण्यात आला गटविकास अधिकारी अविनाश थोरात, ग्रामपंचायत सदस्य, व्यवस्थापन समिती अध्यक्ष, गावकरी, ग्रामसेविका मुख्याध्यापक, उपशिक्षक व विद्यार्थ्यांचे पालक यावेळी उपस्थित होते. दरम्यान तालुक्यातील २१८ छोट्या मोठ्या शाळांतुन आठ हजाराहुन अधिक विद्यार्थी आज पहिल्या दिवशी हजर झाले त्यात ४२५५ मुले व ४१०३ मुलींचा समावेश असल्याची माहिती पुरंदरचे गट शिक्षण अधिकारी राजकुमार बामणे यांनी या निमित्ताने दिली.



# सुपा पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाची तत्पर कामगिरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर-** बारामती तालुक्यातील सुपा शनिवार दि १३ रोजी रात्री सुमारे ९.०० वा. पीडीसीसी बँक परिसरात शितल विकास टेमगिरे ( ता. दौंड) यांचे गळ्यातील सव्वा तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र हरवले होते. याबाबत त्यांनी सुपा पोलीस स्टेशन येथे संपर्क साधून मदतीची विनंती केली. सदर घटनेची माहिती मिळताच सुपा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांनी तत्काळ गुन्हे शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस कॉन्स्टेबल किसनराव ताडगे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव साळुंखे व पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब चौधरी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली तसेच गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम सुरू केली. सखोल तपास आणि शोधकार्यादरम्यान सदर मंगळसूत्र एका महिलेस मिळून आल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर संबंधित महिलेकडून मंगळसूत्र ताब्यात घेऊन ते मूळ मालक शितल विकास टेमगिरे यांना सुपूर्द करण्यात आले. हरवलेले सव्वा तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, किंमत अंदाजे रु. १,५०,०००/- इतकी असून, अल्पावधीत शोधून दिल्याने शितल विकास टेमगिरे यांनी सुपा पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड तसेच प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस कॉन्स्टेबल किसनराव ताडगे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव साळुंखे व पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब चौधरी यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# भीमाशंकर परिसर एक आदर्शवत ज्योतिर्लिंग : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** श्री क्षेत्र भीमाशंकर मधिल हेरिटेज व्हिलेज व परिसरातील कामे कुंभमेळ्यापुर्वी वेगात पुर्ण करून भाविकांना चांगल्या सोईसुविधा देण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत. येथील ग्रामस्थांनीही आत्ता पर्यंत चांगले सहकार्य केले आहे पुढेही कोणाच्या भुलथाप्पांना बळी पडू नका असे अवाहन सुनेत्रा पवार यांनी केले. श्री क्षेत्र भीमाशंकर परिसर विकास अराखडयातून सुरू असलेल्या कामांची राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पहाणी केली, यावेळी त्यांच्यासमवेत राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार बाबाजी काळे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, अतुल बेनके, देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे इत्यादी उपस्थित होते.

यावेळी सुनेत्रा पवार यांनी नविन होणा-या भीमाशंकरवाडीच्या जागेची पहाणी केली. यावेळी वास्तुविशारद हेमंत पाटील यांनी संपुर्ण अराखडयाचे सादरीकरण केले. मंदिर परिसरात सुरू असलेले सभामंड व पायरी मार्गच्या कामाची पहाणी केली. भीमाशंकर चे दर्शन करून त्यांनी कळमजाई मातेचे दर्शन घेतले. येथे त्यांनी ग्रामस्थांनी संवाद साधला, यावेळी बोलताना सुनेत्रा पवार यांनी ग्रामस्थांना विश्वास देत तुमचे कोणतेही नुकसान होणार नाही, प्रत्येकाला चांगले घरे, व्यवसायासाठी दुकाने दिली जातील. भीमाशंकर मध्ये येणा-या भाविकाला येथील गाव व मंदिर परिसर पाहून प्रसन्न वाटले पाहिजे असे काम होणार आहे. आंबेगाव व खेड दोन्ही तालुक्याचा विचार अराखडयात केला गेला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे दर्शन सुरू असताना बाहेर सर्व नेत्याचा संवाद सुरू होता. यावेळी बोलताना वळसे पाटील म्हणाले, दिलीप दत्तात्रय वळसे पाटील, दिलीप दत्तात्रय मोहिते पाटील, शिवाजीराव दत्तात्रय आढळराव पाटील, कै.वल्लभ दत्तात्रय बेनके असे आमचे पहिल्या पासून साम्य आहे. उगाच माध्यमे आमच्यात भांडण लावतात. आमच्यात काहि भांडण नाही आमच्यात प्रेम आहे. फक्त कधि कधी जास्त प्रेम उतू जात. लोकांच्या भावना राखण्यासाठी बोलाव लागत. मंदिर खेड तालुक्यात आहे हे आम्हाला मान्य आहे. मंदिर खेड मध्ये वरच भीमाशंकर गाव आंबेगाव मध्ये आहे. दोन्ही गावांच्या लोकसंख्या जवळजवळ सारख्याच आहेत. मी कधी भेदभाव केला नाही, खेडची कामे घेवून लोक माझे कडे आले तर ती मी करतो असे दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले. चैकट यावेळी दिलीप माहिते म्हणाले, भीमाशंकर परिसर विकास अखरडा होत असताना खेड तालुक्याचा विचार व्हावा अशी आमची मागणी आहे. अनेक वर्ष पासून भीमाशंकर कडे जाण्यासाठी भोरगिरी मार्गे रस्ता असावा अशी मागणी आहे. खरा भीमाशंकरचा प्राचीन रस्ता भोरगिरी मार्गेच होता. भोरगिरी मध्ये कोटेश्वर मंदिर आहे, येथेच गुप्त भीमाशंकर आहे. परंतु बहुतांश कामे आंबेगाव तालुक्याच्या भागात दिसतात असे म्हणणे मांडले. चैकट आंबेगाव व खेडच्या मुद्दयावरून कमळजाई मंदिरात वळसे पाटील व दिलीप मोहिते पाटील यांच्यात शाब्दिक चकमक सुरू होताना सुनेत्रा पवार यांनी मध्यस्ती करून तुम्ही थांबा आपण दोन्ही तालुक्यांचा समान विचार करणार आहोत.



# दीड वर्षानंतर जेजुरीत सोमवती अमावास्येचा सोहळा

## खंडेरायांच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** दीड वर्षांच्या कालावधीनंतर आलेल्या सोमवती अमावास्येनिमित्त सोमवारी (दि. १५) जेजुरी नगरीत भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. कुलदैवत खंडेरायांच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक रविवारी दुपारीपासूनच जेजुरीत दाखल झाले होते. सोमवती अमावास्येच्या पार्श्वभूमीवर पहाटे २ वाजता श्री खंडोबा देवांच्या पालखीचे मंदिरातून प्रस्थान झाले. पारंपरिक धार्मिक विधी, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात पालखी कऱ्हा नदीकडे रवाना झाली. पहाटे सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास कऱ्हा नदीच्या तीरावर श्रींच्या उत्सवमूर्तींना विधिवत स्नान घालण्यात आले. या धार्मिक सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी आणि पुण्यस्नानासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. मंदिर परिसर, गडकोट आणि कऱ्हा नदी परिसर भक्तांच्या गर्दीने फुलून गेला होता. सोमवती अमावास्येनिमित्त खंडोबा मंदिर गडकोटाला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. या रोषणाईमुळे संपूर्ण गडकोट परिसर उजळून निघाला असून, रात्रीच्या वेळी मंदिराचे मनमोहक रूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरत होते. सोहळ्यादरम्यान देवस्थान प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्वयंसेवकांनी भाविकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था केली होती. सोमवती अमावास्येनिमित्त दिवसभर खंडेरायांच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# जिल्हा परिषद मॉडेल स्कुल शिंगवे शाळा पूर्वतयारी मेळावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे पारगाव :** जिल्हा परीषद प्राथमिक शाळा शिंगवे इयत्ता पहिलीत दाखल पात्र असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा खूप प्रभावी असून यामुळे मुलांना अंगणवाडीतून शाळेत येण्यापूर्वीच शाळेविषयी आवड झालेली पाहायला मिळाली. याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगवेचा विद्यार्थ्यांचा शाळा पूर्वतयारी मेळावा घेऊन विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक विकासाची, चाचणी विविध खेळ व उपक्रमांची माहिती देण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे पंचायत समिती कृषी विस्तार अधिकारी सुनील काटे, शिक्षणाधिकारी विस्तार अधिकारी शैला निमसे,केंद्रप्रमुख राजु जाधव,ग्रामविकास अधिकारी मोरे,पंचायत समिती सदस्य श्वेता ढोबळे, पोलीस पाटील गणेश पंडीत,उपसरपंच हिरामण गोरडे, मा.शिक्षक दिलीप गोरडे तसेच पहिलीमध्ये दाखल होणारे विद्यार्थी,पालक,शिक्षक उपस्थित होते व शाळा पूर्व मेळाव्यास वर्गशिक्षिका वैजयंती लोखंडे यांनी शुभेच्छा दिल्या. शाळा पूर्वतयारी कार्यक्रमासाठी संगीता इंदोरे,सुभाष इंदोरे,विलास भोर,अशोक लोखंडे, डुकरे सर यांनी काम पाहिले . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर यांनी केले. शाळा पूर्वतयारीचे नियोजन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समीर गोरडे, उपाध्यक्ष रेखा पाबळे, शिक्षण समिती सदस्य महेश बांगर यांनी केले. तसेच पहिली वर्गामध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना वही पेन पुस्तक, ड्रेस वाटप करण्यात आले तसेच माजी.शालेय व्यवस्थापन समिती सदस्य माऊली पाबळे यांच्या माध्यमातून गरीब विद्यार्थ्यांना वही पेन पेन्सिल देण्यात आले. ग्रामपंचायतच्या माध्यमातून सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना लाडुचे वाटप तसेच मा.शिक्षक दिलीप गोरडे यांच्या माध्यमातून सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बिस्किटे पुडे वाटप करण्यात आले

# सोमेश्वर विद्यालयात नवागतांचे स्वागत




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या आंबी बुद्रुक येथील सोमेश्वर विद्यालयात पाचवीच्या वर्गात दाखल झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले.

ढोल ताशांच्या गजरात विद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून मुख्य इमारती पर्यंत स्वागतफेरी काढण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सोमेश्वर साखर कारखान्याचे संचालक हरिभाऊ भोंडवे, शिक्षण संस्थेचे सचिव भारत खोमणे, आंबी बुद्रुकच्या सरपंच शीतल जगताप, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लालभाई शेख, सामाजिक कार्यकर्ते विजय कुतवळ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रतिभा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शिक्षिका नूतन काळाणे यांनी विद्यालयात चाललेल्या उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष जेधे यांनी केले तर आभार हेमंत गडकरी यांनी मानले.

# शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल वाघापूर येथे विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** उन्हाळ्याची सुट्टी संपून शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ सोमवार दिनांक १५ जून रोजी झाला. पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील वाघापूर येथील शारदा इंग्लिश मेडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करत शालेय प्रवेश झाला आहे.

या स्कूल मधील वर्गखोल्या विद्यार्थ्यांनी गजबजल्या आहेत. नवीन प्रवेश घेतलेली छोटी छोटी रडणारी मुले, नटून थटून मोठ्या उत्साहात आलेले विद्यार्थी, आणि पालकांची मुलांना शाळेत घेऊन यायची झालेली धांदल, शिक्षकांकडून होणारे स्वागत, पालक व ग्रामस्थांची हजेरी यामुळे शाळेचा परिसर आनंदी झाला असल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

मुलांना शालेय साहित्य देण्यात आले , ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती , गावकरी, मुख्याध्यापक, उपशिक्षक व विद्यार्थ्यांचे पालक यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते




# द•ख•ल

## शिक्रापुर येथे पिकअप वाहनातून जनावरांची निर्दयीपणे वाहतूक

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे- अहिल्यानगर महामार्गावर जनावरांना पिकअप वाहनातून दाटीवाटीने बांधून निर्दयीपणे वाहतूक करणाऱ्या दोघांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले असून नितीन सादव बोरसुरे व दिगंबर नामदेव गव्हाणे असे पोलिसांनी गुन्हे दाखल केलेल्या दोघांची नावे आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे-अहिल्यानगर महामार्गावरून एका पिकअप मधून दाटीवाटीने जनावरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती बजरंग दलाचे कार्यकर्ते आबा पुरोहित यांनी शिक्रापूर पोलिसांना दिली त्यांनतर पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन एम एच १२ वाय क्यू ६९२४ या पिकअपची पाहणी केली असता त्यामध्ये दाटीवाटीने तीन गाय निर्दयीपणे बांधल्या असल्याचे दिसून आले, यावेळी पोलिसांनी चालकाकडे चौकशी केली असता त्याने सदर गाय दिगंबर गव्हाणे यांच्या असल्याचे सांगितले, यावेळी पोलिसांनी चालकाला ताब्यात घेऊन पिकअप जप्त करत गायांची रवानगी गोशाळेत केली, याबाबत पोलीस शिपाई विकास दत्तात्रय बांगर (रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी नितीन सादव बोरसुरे (वय २१ सध्या रा. केसनंद ता. हवेली जि. पुणे मूळ रा. कोटमाळ ता. हूलसर जि. विदर कर्नाटक) व दिगंबर नामदेव गव्हाणे (वय ४१ वर्षे रा. सोनकुरवाडी ता. मंठा जि. जालना) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार बापू हाडगळे हे करीत आहे.

## आठवडे बाजारात दागिन्यांची चोरी करणाऱ्या दोन महिलांवर गुन्हा दाखल

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील आठवडे बाजारात दागिने व मोबाईल चोरीच्या घटना वाढत असताना शिक्रापूर पोलिसांच्या गस्तीदरम्यान दागिने चोरी करणाऱ्या दोन महिला पोलिसांच्या जाळ्यात अडकल्या असून सारिका संजू जाधव व साक्षी मेघराज पवार असे पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्या महिलांची नावे आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) परिसरातील आठवडे बाजारात महिला व बालकांचे दागिने आणि मोबाईल चोरीच्या घटना वाढत असल्याने पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी अनोखी मोहीम सुरु केली असून नुकतेच पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पोलीस हवालदार अमोल दांडगे, नारायण वाळके, महिला पोलीस शिपाई पल्लवी वाघोले हे शिक्रापूर आठवडे बाजारात गस्त घालत असताना त्यांना दोन महिला बालकांच्या गळ्यातील दागिने चोरी करण्याचा प्रयत्न करताना मिळून आल्या, दरम्यान पोलीस पथकाने त्यांना ताब्यात घेतले, याबाबत महिला पोलीस शिपाई पल्लवी राजाराम वाघोले (वय ३० वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सारिका संजू जाधव (वय ४२ वर्षे) व साक्षी मेघराज पवार (वय ३० वर्षे रा. मंतरवाडी हडपसर पुणे) या दोघींवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार हनुमंत गिरमकर हे करत आहे.

## पाबळमध्ये घरातच आढळला गुटख्याचा साठा

### अन्न व औषध प्रशासनाकडून दीड लाखांचा गुटखा जप्त

**तळेगाव ढमढेरे :** पाबळ (ता. शिरूर) येथील जाधव वस्ती येथे जमदाडे मळा मध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने छापा टाकत कारवाई केली असता एका घरामध्ये तब्बल दीड लाख रुपयांचा गुटखा साठा आढळून आला असून याप्रकरणी किशोर सुभाष जाधव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाबळ (ता. शिरूर) येथील जाधव वस्ती येथे जमदाडे मळा मधील किशोर जाधव या युवकाने घरामध्ये बेकायदेशीरपणे गुटख्याचा साठा केला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पदाधिकाऱ्यांना मिळाली, त्यानंतर अन्नसुरक्षा अधिकारी लक्ष्मीकांत सावळे हे त्यांच्या पथकासह सदर ठिकाणी हजर झाले, त्यांनी किशोर जाधव यांच्या घराची झडती घेतली असता त्यांच्या घरामध्ये शासनाने बंदी घातलेला व मानवी जीवितास हानिकारक असलेला तब्बल १ लाख ५३ हजार रुपयांचा अवैध्य गुटखा साठा मिळून आला, दरम्यान अन्न व औषध विभागाच्या प्रशासनाने सर्व गुटखा साठा जप्त करत गुटखा साठा करणाऱ्या किशोर जाधव याला ताब्यात घेतले, तर याबाबत अन्नसुरक्षा अधिकारी लक्ष्मीकांत सोमनाथ सावळे (वय ४४ वर्षे रा. नवनगर विकास प्राधिकरण, मोशी प्राधिकरण, पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी किशोर सुभाष जाधव (वय २४ वर्षे रा. जाधव वस्ती, जमदाडे मळा, पाबळ ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे हे करत आहे.

# प्रा. भाऊसाहेब थोरात यांची पुणे जिल्हा मल्लखांब संघटनेच्या उपाध्यक्ष पदी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**डिंभे :-** घोडेगाव येथील बी. डी. काळे महाविद्यालयाचे सेवा निवृत शारीरिक शिक्षण संचालक प्रा. भाऊसाहेब गंगाधर थोरात यांची पुणे जिल्हा मल्लखांब संघटनेच्या उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. नुकत्याच जिल्हा मल्लखांब संघटनेच्या कार्यकारणी सभेत प्रा. भाऊसाहेब थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे प्रा. थोरात यांनी त्यांच्या सेवा काळातही अनेक खेळाडूंना मल्लखांब खेळाचे मार्गदर्शन करून राज्य, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठ स्तरापर्यंतचे खेळाडू त्यांनी तयार केले आहेत. मल्लखांब खेळातील त्यांचा असलेला अनुभव म्हणजे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक व निवड समिती सदस्य आणि अध्यक्ष म्हणून त्यांनी २५ वर्षे उत्तम कामगिरी केली आहे. तसेच आज तगायत ते खेड, आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील शाळा,महाविद्यालयात जाऊन ग्रामीण व आदिवासी भागात मल्लखांब खेळाचे मार्गदर्शन करून या खेळाच्या प्रसाराचे काम करत आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

द • ख • ल

## गाडे शिक्षण संस्थेत दिमाखात प्रवेशोत्सव



**नगर तालुका :** शाळेच्या प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी , रंगीबेरंगी फुलांनी व फुग्यांनी सजवलेले प्रवेशद्वार, बॅन्ड पथकाचा निनाद, गुलाबपुष्प व चॉकलेटची भेट देऊन दिमाखात नविन मुलांचे स्वागत. आणि पहिल्याच दिवशी मोबाईल पासुन दूर राहण्याचा मुलांचा निर्धार अशा आनंददायी वातावरणात फकिरवाडा, मुकुंदनगर येथील मुलांचा स्वागत सोहळा पार पडला. यशवंत माध्यमिक विद्यालय व श्री गणेश बालक मंदिर मध्ये मुले शिक्षकांच्या स्वागताने अक्षरशः भारावुन गेले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष एम पी कचरे होते. यावेळी संस्थेचे सहसचिव आसाराम म्हस्के ,खजिनदार रामचंद्र दिघे, मनपा शिक्षण मंडाळाचे विशेष शिक्षक काशिनाथ साबळे, गणेश बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका अंजली निकड, आदिनाथ लवांडे, भाऊसाहेब काकडे, सुरेखा आठरे, उध्दव गुंड, छबुराव कर्डिले, किशोर चाबुकस्वार, अर्चना जाधव, नम्रता आल्हाट, संतोष जाधव व पालक मोठ्या संख्येने उपस्थीत होते. यावेळी मुलांना मोफत पाठ्यपुस्तकांचे व खाऊचे वाटप करण्यात आले. मुलांना नियमित शाळेत येण्याचा व अभ्यास करण्याचा कानमंत्र संस्थेचे उपाध्यक्ष एम पी कचरे यांनी दिला. स्वागत मुख्याध्यापिका संगिता बनकर यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका योगेश गुंड यांनी तर सूत्रसंचालन मनिषा मगर यांनी केले. चंद्रकला साठे यांनी आभार मानले.

## राज्य उपाध्यक्षपदी प्राचार्य देविदास सोनटक्के यांची निवड



**पाथर्डी :** मराठी राजभाषा संवर्धन समिती प्रतिष्ठान अहिल्यानगर या महाराष्ट्र राज्य क्षेत्र असलेल्या संस्थेच्या राज्य उपाध्यक्षपदी टाकळीमानुर येथील श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य देविदास सोनटक्के यांची निवड करण्यात आली या निवडीमुळे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉक्टर विवेक भापकर ,सचिव ड विश्वासराव आठरे , सह सचिव मुकेश मुळे व खजिनदार ड दीप लक्ष्मी म्हसे मॅडम यांनी सोनटक्के यांचे अभिनंदन केले तसेच मराठी राजभाषा संवर्धन समिती प्रतिष्ठानचे संस्थापक अमोल क्षीरसागर व अध्यक्षा सौ सुलोचना क्षीरसागर यांनी देखील प्राचार्य सोनटक्के यांचे अभिनंदन केले आहे मराठी राजभाषेचा प्रचार प्रसार व भाषेची गोडी वाढविण्यासाठी जोमाने काम करण्याची जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण करण्याची भावना सोनटक्के यांनी व्यक्त केली. विद्यालयाचे पर्यवेक्षक वैरागर सर सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष शाम गुंजकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी तसेच ग्रामस्थांच्या वतीनेही अभिनंदन करण्यात आले.

## महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात



**नगर तालुका :** केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात इ. ५ वी च्या वर्गातील तसेच विदयालयातील नवीन विद्यार्थिनीचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. याप्रसंगी सुरेख रांगोळी वृषाली मेहेत्रे यांनी रेखाटली. फलक लेखन व स्वागताची तयारी समृद्धी गरड, मेघा पोपळघट, राजश्री पालवे, छाया शिंदे यांनी केली.याप्रसंगी राजश्री शाहू संस्थेचे सचिव बबनराव कोतकर , खजिनदार प्रल्हाद साठे उपस्थित होते. विद्यालयाच्या प्राचार्य वासंती धुमाळ ज्येष्ठ शिक्षक संजय निक्रड यांच्या हस्ते विद्यार्थीना पाठ्यपुस्तक गुलाबपुष्प व पेन देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री कोतकर यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती गुंड यांनी केले. आभार वनिता जाधव यांनी मानले. याप्रसंगी जालिंदर सातपुते, नामदेव वायळ, नितीन गोफणे, किशोर बोरकर, इत्यादींनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

## एमबीबीएस उत्तीर्ण विद्यार्थिनींचा राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्थेकडून गौरव



**लिंपणगाव :** वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या एमबीबीएस परीक्षेत यश संपादन करून उत्तीर्ण झालेल्या होतकरू विद्यार्थिनींचा राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्थेच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ॲड रमेश सदाशिव जठार यांची कन्या कु.शिवानी रमेश जठार हिने बीजे मेडिकल कॉलेज पुणे येथे व श्री दीपक रामदास शिंदे पूर्वा केम टेक प्रायव्हेट लिमिटेड डिव्हिजनल मॅनेजर यांची कन्या कु.अदिती दीपक शिंदे हिने एसएमबीटी कॉलेज नाशिक येथे एमबीबीएस या वैद्यकीय शिक्षणासाठी अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीने.एमबीबीएस या कठीण अभ्यासक्रमात यश मिळवून आपल्या कुटुंबासह श्रीगोंदा तालुक्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या विद्यार्थिनींचा सन्मान करण्यासाठी राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्थेने पुढाकार घेतला. यावेळी पुष्पगुच्छ देऊन व शाल परिधान करून विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे चेअरमन प्रकाश निंभोरे, व्हाईस चेअरमन बाळासाहेब भोर, संचालक माधव बनसोडे, ड. रमेश जठार तसेच संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांच्या भावी वैद्यकीय सेवेसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. यावेळी उपस्थितांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या जिद्दीने वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून त्यांनी समाजसेवेची भावना जपत आपल्या ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्य रुग्णांच्या सेवेसाठी करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थिनींचे कुटुंबीय उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना विद्यार्थिनींनी मिळालेल्या सन्मानाबद्दल राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्थेचे आभार मानले व भविष्यात प्रामाणिकपणे वैद्यकीय सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला.

# ऋषी नागार्जुनांच्या वारशावर घाला?

## नागलवाडीतील पुरातन अवशेष नष्ट करण्याचा प्रयत्न हाणून पाडला



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

एक टन वजनाचा नंदी गायब! नागलवाडी येथील प्राचीन नागार्जुन गुहा परिसरातील सुमारे एक टन वजनाचा भग्न अवस्थेतील दगडी नंदी रहस्यमयरीत्या गायब झाला आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या या मंदिरातील महत्त्वाचा अवशेष नाहीसा झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला असून प्रकरणाची चौकशी करून नंदीचा शोध घेण्याची मागणी केली आहे. मंदिर परिसरातील पुरातन अवशेषांच्या सुरक्षेचाही प्रश्न यानिमित्ताने ऐरणीवर आला आहे.

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील डोंगराळ परिसरात असणाऱ्या नागलवाडी येथील काशी केदारेश्वर मंदिर परिसरातील ऋषी नागार्जुन गुहा, पुरातन शिवपिंड, नंदी आणि इतर ऐतिहासिक अवशेषांच्या अस्तित्वावरच संकट ओढवल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या परिसरातील पुरातन वारसा नष्ट करून बेकायदेशीर बांधकाम उभारण्याचा प्रयत्न होत असल्याने ग्रामस्थ, भाविक आणि इतिहासप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

नागलवाडी, गोळेगाव आणि परिसरातील डोंगरदऱ्यांच्या मध्यभागी वसलेले काशी केदारेश्वर मंदिर हे धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थळ मानले जाते. घनदाट जंगल, डोंगरकपारी आणि नैसर्गिक वातावरणात वसलेल्या या परिसरात अनेक ऋषी-मुनी, संत-महंत यांचे वास्तव्य असल्याच्या आख्यायिका आजही सांगितल्या जातात. स्थानिक परंपरेनुसार प्रभू राम, सीता आणि लक्ष्मण यांनी वनवास काळात या परिसरात वास्तव्य केल्याचेही सांगितले जाते. यासंदर्भातील काही अवशेष आजही परिसरात आढळून येत असल्याचा दावा ग्रामस्थ करतात.

या भागाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ऋषी नागार्जुन यांच्याशी जोडला गेलेला इतिहास. स्थानिकांच्या मते, प्राचीन काळात ऋषी नागार्जुन यांनी या डोंगररांगांमध्ये दीर्घकाळ वास्तव्य करून वनस्पतीआधारित औषधनिर्मिती, रसायनशास्त्र आणि विविध संशोधन कार्य केले होते. त्यांच्या नावावरूनच या परिसराला नागलवाडी हे नाव पडल्याची आख्यायिका पिढ्यान् पिढ्या सांगितली जाते. त्यामुळे हा परिसर केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक मानला जातो.

ज्या ऋषींच्या नावावरून नागलवाडीची ओळख निर्माण झाली, त्या ऋषींच्या वारशाचे पुरावेच आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. सुमारे एक टन वजनाचा नंदी गायब होतो आणि पुरातन अवशेषांच्या शेजारी बांधकाम सुरू होते, ही अत्यंत गंभीर बाब आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ बाळासाहेब ढाकणे यांनी व्यक्त केली.

मात्र अलीकडेच या परिसरात पुरातन अवशेषांच्या जवळ बेकायदेशीर बांधकाम सुरू करण्यात आल्याचे समोर आले. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ऋषी नागार्जुन गुहेजवळ असलेल्या पुरातन महादेव मंदिरातील शिवपिंड, ऐतिहासिक दगडी अवशेष आणि सुमारे एक टन वजनाचा भग्न अवस्थेतील नंदी यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे मंदिर परिसरात असलेला हा नंदी आता गायब झाल्याचेही निदर्शनास आले असून त्यामुळे संशय अधिकच बळावला आहे. इतिहासाच्या खुणा जपणाऱ्या या स्थळावर नव्याने बांधकाम करून मूळ पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेची माहिती मिळताच काशी केदारेश्वर देवस्थानचे प्रमुख ह.भ.प. बाबागिरी महाराज, ग्रामस्थ, भाविक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पाहणीनंतर त्यांनी संबंधित प्रशासनाकडे तक्रार दाखल करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली. तक्रारीची गंभीर दखल घेत वन विभागाने त्वरित कारवाई केली. वनरक्षक पालवे यांनी घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेले बांधकाम थांबवले तसेच बांधकामासाठी आणण्यात आलेले साहित्य जप्त केले.

# पावसाअभावी खरिपाच्या पेरण्या लांबणीवर

## जलसाठा संपुष्टात; शेतकरी चिंताग्रस्त !

**नंदकुमार कुरुमकर। राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात चालू वर्षी पावसाने हुलकावणी दिली. रोहिणी नक्षत्र कोरडे गेले मृग नक्षत्र सुरू झाले, परंतु पावसाला मात्र जोर नाही. पाऊस लांबल्यामुळे खरिपाच्या पेरण्या व लागवडी मोठ्या प्रमाणावर लांबणीवर पडल्या आहेत. तालुक्यातील सर्वच गावांमध्ये जलसाठा संपुष्टात आल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या नजरा मात्र आता आकाशाकडे लागल्या आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी जमिनीच्या मशागतीपूर्व तयारी पूर्ण केली. नांगरणी, कोळपणी करून जमीन खरीप हंगामासाठी सज्ज ठेवली. परंतु पाऊस मात्र फिरकायला तयार नाही. तालुक्यात सर्वत्र जलसाठा संपुष्टात आल्याचे जाणवते. मध्यंतरी मागील आठवड्यात सात जून रोजी मृग नक्षत्र सुरू होताच वादळी वाऱ्यासह तालुक्यातील काही ठिकाणी पावसात प्रारंभ झाला. शेतकऱ्यांच्या अपेक्षाही तितक्याच वाढल्या गेल्या होत्या. परंतु पुन्हा दोनच दिवसांमध्ये आकाश स्वच्छ होऊन उन्हाची तीव्रता वाढली गेली. वारेही भिरभिरू लागले. अनेक शेतकऱ्यांनी एकाच पावसाच्या धरतीवर खरिपासाठी लागणारी बियाणे खरेदी केले. परंतु पाऊस पुन्हा लांबल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त बनले आहेत. एकीकडे शासनाने कर्जमाफीची पूर्ण तयारी केल्याचे समजते. मात्र या कर्जमाफीमध्ये अनेक जाचक अटी ठेवल्यामुळे अनेक शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. असे दिसते. एकीकडे शेतकऱ्यांकडे पीक व विविध कर्जाचा सेवा संस्था व बँकांचा बोजा शेतकऱ्यांच्या माथी दिसतो आहे. शेतकऱ्यांना मोठी अपेक्षा होती, सरसकट कर्ज माफ होईल, परंतु राज्य सरकारने घोषणा केली मात्र ती घोषणा शेतकऱ्यांच्या दृष्टीने फसवी असल्याचे शेतकऱ्यांच्या भावनांवरून दिसून येत आहे.

सद्यस्थितीला कर्जमाफीच्या धोरणांवरोधात तालुक्यात पक्ष मतभेद विसरता अनेक शेतकरी आंदोलन करताना दिसत आहेत. त्यामध्ये कर्जतचे आमदार रोहित दादा पवार हे पंढरपूर येथे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी यासाठी अन्नत्याग आंदोलनाला बसले आहेत. त्यांनाही तालुक्यातून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिल्याचे शेतकऱ्यांकडून समजले. यासाठी प्रशासनाने तातडीने पाणीटंचाईचा आढावा घ्यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# महावितरणकडून विजेला पर्याय म्हणून ‘सोलर’ प्रकल्प अमलात आणणार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव :** दिवसे - दिवस प्रत्येक कुटुंबाला आणि ओलिताखाली येत असलेल्या प्रत्येक जमिनीला विजेची मोठी गरज निर्माण होत असताना व नेमकेपणाने त्याचीच उणीव भासू लागल्याने सध्या अस्तित्वात असणारा विजेचा पुरवठा मागणीनुसार कमी पडत असल्याने त्याला पर्याय म्हणून आता वीज महावितरण कंपनीने कंपनीमार्फत स्वतंत्र सोलरचा प्लॅन हाती घेतला असून त्यामधून तयार होणाऱ्या विजेचा पुरवठा थोड्याच दिवसात वीजग्राहकापर्यंत पोहचवला जाईल कारण त्याचे काम वीज महावितरणकडून युद्धपातळीवर सुरू असल्याबाबतची माहिती वीज महावितरणचे चापडगाव शाखा क्रं १ चे कनिष्ठ अभियंता मंगेश गांगुर्डे व शाखा क्र.२ चे सहाय्यक अभियंता दिनेश माळी यांनी आमचे प्रतिनिधीजवळ दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की,राज्यात ओलिताखाली येणाऱ्या जमिनीचे क्षेत्र मोठ्या संख्येने वाढले असून अजूनही त्यामध्ये भविष्यात वाढ होताना दिसून येत असल्याने तसेच औद्योगिक व घरगुती ग्राहकांनाही विजेची मोठ्या प्रमाणात गरज भासत असून या सर्व बाबींचा सारा - सार विचार करता मागणीप्रमाणे वीज पुरवठा करण्याचे दिवस आता जवळपास संपुष्टात आले असल्याने व त्यातच ऐन संध्याकाळच्या वेळी ६ ते १० या दरम्यान जो वीज पुरवठा करण्यात येतो अत्यंत गरजेचा असून तोही पूर्ण दाबाने करावा लागत आहे .मात्र याच वेळेत जो विजेचा पुरवठा केला जात आहे तो महावितरणला महागड्या किमतीचा घेऊन करावा लागत आहे. वीज ही बाब सर्वच क्षेत्रात अत्यंत अत्यावश्यक व महत्वाची झाली असल्याने त्याला पर्याय म्हणून सोलारचा प्लॅन हाती घेतला असून चापडगाव सबस्टेशनमध्ये सोलरच्या बॅटरी उभारणीचे तर लगतच असणाऱ्या हसनापूर शिवारात सोलरच्या प्लेटा बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात असून हे काम पूर्ण होताच सोलरच्या प्लॅटातून तयार झालेली वीज चापडगाव येथे असणाऱ्या २५ एम व्ही ए च्या ठिकाणी बसवण्यात आलेल्या बॅटरीमध्ये साठवणूक करण्यासाठी घेण्यात येईल व त्या मध्ये साठवलेल्या विजेचा महावितरण कडून आपल्या सोयीनुसार आपल्या कार्यक्षेत्रात पुरवठा करेल सोलरपासून उपलब्ध झालेल्या या विजेचा लाभ चापडगाव सब स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कक्ष न १ मधील १४ गावांना तर कक्ष न. २ मधील १७ गावातील शेतकऱ्यांसह इतरही क्षेत्रांनाही त्याचा लाभ होणार असल्याचे गांगुर्डे व माळी यांनी सांगितले आहे.

# जेऊरमध्ये गतिरोधक बसविण्याची मागणी

## महामार्गावरील भरधाव वाहतुकीमुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**छत्रपती संभाजी नगर महामार्गावरील जेऊर येथील महावितरण कंपनी चौक. येथे गतिरोधक बसविण्याची मागणी होत आहे.**

महामार्गावरील भरधाव वाहतुकीमुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने गतिरोधक, झेब्रा क्रॉसिंग, सिग्नलची व्यवस्था तसेच अपघात टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात.
**सोमनाथ हारेर**

**नगर तालुका :** छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या दुरुस्तीचे काम सध्या सुरू असून जेऊर येथील मुख्य चौक तसेच महावितरण कंपनीजवळील चौकात तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिक, पालकवर्ग व पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून होत आहे. या दोन्ही चौकांमधून दररोज शेकडो विद्यार्थी शाळा, महाविद्यालये व विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जाण्यासाठी महामार्ग ओलांडत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

डोंगरगण, चापेवाडी, इमामपूर, शेटे वस्ती, म्हस्के वस्ती, आढाववाडी, धनगरवाडी आदी परिसरातील विद्यार्थी पायी अथवा सायकलवरून प्रवास करत या चौकातून महामार्ग ओलांडतात. मात्र महामार्गावरील वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. सकाळी व सायंकाळी शाळा आणि महाविद्यालयांच्या वेळेत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. जेऊर मध्ये पंचक्रोशीतील शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षणासाठी येत असतात.पायी अथवा सायकलवरून विद्यार्थ्यांचा प्रवास असतो. महामार्गावरील भरधाव वेगाने चालणारी वाहतूक विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरू शकते.

यापूर्वी या परिसरात अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे. महामार्ग दुरुस्तीचे काम सुरू असतानाच या दोन्ही चौकांमध्ये गतिरोधक उभारणे, वाहतूक सिग्नल बसविणे, झेब्रा क्रॉसिंग पट्टे तयार करणे, वेगमर्यादा दर्शविणारे व सावधानतेचे सूचनाफलक लावणे तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अन्य आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# शेतरस्त्यावर नांगर फिरविला शेतकऱ्यांचा खोळंबा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बाबुर्डी घुमट (ता. नगर) येथील शिंदे मळा परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीत ये-जा करण्यासाठी असलेला पारंपरिक गाडी रस्ता बंद झाल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित रस्ता तातडीने मोकळा करून द्यावा आणि शेतकऱ्यांच्या शेतीकामासाठी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शेतकरी गोरख विश्वनाथ जाधव यांनी महसूल विभागाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या वेळी कांताबाई जाधव, दिनेश निकाळजे, प्रिया निकाळजे, सुनील कांबळे आदी उपस्थित होते. दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, मौजे बाबुर्डी घुमट (ता. जि. अहिल्यानगर) येथील गट क्रमांक २७९ मधील शेतजमीन समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत सन २००७ पासून सात लाभार्थी खातेदारांना देण्यात आली आहे. या लाभार्थी शेतकऱ्यांच्या मालकीच्या शेतजमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी पूर्वापार गाडी रस्ता अस्तित्वात असून तो महसूल नकाशामध्येही नमूद असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

सदर रस्त्याचा वापर करून लाभार्थी शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून शेती मशागत, पेरणी, कापणी तसेच अन्य शेतीविषयक कामांसाठी ये-जा करत होते. मात्र अलीकडे शेजारील शेतकरी सर्जे राव काळे यांनी हा रस्ता नांगरून टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित रस्ता पूर्णतः बंद झाला असून शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात जाणेही कठीण झाले आहे.

# जून महिन्याचा मध्यान्ह आला तरी मान्सून सक्रिय नाही...

## सर्वसामान्य शेतकरी चिंताग्रस्त ; मागील वर्षी १४ जूनला सीनाधरण ओव्हरफ्लो

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### धरणाचा उपयुक्त पाणीसाठा अवघ्या १४ टक्क्यांवर

**कर्जत :** जून महिना मध्यान्हात आला असून आजमितीस उन्हाची तीव्रता कमी होताना दिसत नाही. मान्सून देखील लांबणीवर पडल्याचे चिन्हे दिसत आहे. मान्सून सक्रिय झाला नसल्याने कर्जत तालुक्यातील अनेक पाण्याच्या नैसर्गिक जलस्रोतांनी तळ गाठला आहे. १४ जून २०२५ साली याच दिवशी निमगाव गांगर्डा (ता.कर्जत) येथील सीनाधरण ४० वर्षात प्रथमताच जून महिन्यात भरले होते. मात्र यंदा त्याच सीनाधरणात ३४ टक्के पाणीसाठा असून उपयुक्त पाणीसाठा १४.२७ टक्क्यांवर आला आहे.

कर्जत तालुक्यात यंदा उन्हाने एप्रिल-मे महिन्यात तब्बल ४३ अंशचा पारा गाठला. जून उजाडल्यावर सर्वसामान्य नागरिकांना उन्हाची तीव्रता कमी होईल असे वाटत असताना तब्बल जून महिन्याने देखील मध्यान्ह गाठला असला तरी उन्हाची तीव्रता कायम राहिली आहे. यातच अलनीनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबणीवर पडल्याने अनेक ठिकाणी नैसर्गिक पाण्याच्या जलस्रोतांनी किमान पातळी गाठली आहे. तर काही ठिकाणी कोरडेठाक पडले आहे. कर्जत तालुक्यातील बहुतांश गावात टंचाई विभागाकडून मागणी प्रस्तावानुसार पाण्याचे टँकर देखील सुरू आहे. मागील वर्षी जून मध्यान्हपर्यंत कर्जत तालुक्यातील विक्रमी अवकाळी पावसाची हजेरी यासह वेळेवर पडलेल्या मान्सून पावसाने नदी, नाले, बंधारे यासह तलाव आणि कर्जत तालुक्यातील २१ गावांना लाभदायी ठरणारे सीनाधरण देखील ओसांडून वाहिले होते. १४ जून २०२५ साली सीनाधरणातील इतिहासात



प्रथमताच जून महिन्यात निमगाव गांगर्डा येथील सीनाधरण ओव्हरफ्लो झाले होते. मात्र यंदा याच २.४० टीएमसी क्षमता असलेल्या सीना धरणात ३४ टक्के पाणीसाठा असून उपयुक्त पाणीसाठा १४.२७ टक्क्यांवर आला असल्याची माहिती अभियंता संभाजी पवार आणि सहकारी प्रशांत गांगर्डे यांनी दिली. सीनाधरण प्रकल्पातील पाणी पातळी ५७८.९६ मीटर नोंद असून धरणात सध्या २३.१२ दशलक्ष घनमीटर (८१६.४८ दशलक्ष घनफुट) पाणीसाठा असून यापैकी ७.४७ दशलक्ष घनमीटर (२६३.८० दशलक्ष घनफुट) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. अवकाळी आणि मान्सूनच्या चालू हंगामात एकूण ६९ मिमी पावसाची नोंद झाली असून सक्रिय मान्सूनची प्रतीक्षा परिसरातील नागरिक करीत आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.१६ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## रस्ता अपघातात जखमी तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : रस्ता अपघातात गंभीर जखमी झालेल्या २४ वर्षीय तरुणाचा उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हृषिकेश दारासिग राठोड (वय २४ रा. नायगाव देशमुख, ता. मेहकर, जि. बुलढाणा) असे मृत तरुणाचे नाव आहे. रस्ता अपघातात जखमी झाल्यानंतर त्याला उपचारासाठी खासगी रुग्णवाहिकेद्वारे नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले होते. (दि.१४ जून ) रोजी सकाळी सुमारे १०.४५ वाजण्यापूर्वी जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या हृषिकेश राठोड यांची तपासणी केल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत सोनई पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# १७ जूनपासून पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस धावणार

**अहिल्यानगर स्थानकावर खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते हिरवा झेंडा | प्रवासी, विद्यार्थी आणि साईभक्तांसाठी महत्त्वाची सुविधा उपलब्ध**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारी पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वे सेवा १७ जून पासून सुरू होत आहे. या रेल्वे सेवेचा शुभारंभ पुणे येथे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असून, त्याचवेळी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते रेल्वेला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे.

मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव यांनी याबाबत खासदार नीलेश लंके यांना पत्राद्वारे माहिती दिली असून, मध्य रेल्वेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रणही देण्यात आले आहे. पुणे-साईनगर शिर्डी या थेट रेल्वे सेवेच्या प्रारंभामुळे पुणे, अहिल्यानगर आणि शिर्डी दरम्यानची वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. या मार्गावरील प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारा पर्याय उपलब्ध होणार असून, दैनंदिन प्रवास करणारे नागरिक, शैक्षणिक कारणांसाठी ये-जा करणारे विद्यार्थी तसेच व्यावसायिक



वर्गाला याचा मोठा लाभ मिळणार आहे.

विशेषतः साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीकडे जाणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वे सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या नव्या रेल्वे सेवेच्या माध्यमातून धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच पुणे, अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील व्यापार, उद्योग, पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रेल्वे संपर्क अधिक सक्षम झाल्याने या भागातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला नवे परिमाण प्राप्त होणार असल्याचे मानले जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्याला पुण्याशी अधिक प्रभावी रेल्वे संपर्क उपलब्ध व्हावा तसेच धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना जोडणाऱ्या रेल्वे सेवांचा विस्तार व्हावा, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी संसदेत आणि विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला होता.

रेल्वे मंत्रालय, रेल्वे बोर्ड आणि मध्य रेल्वे प्रशासनाकडे त्यांनी वेळोवेळी या मार्गावरील रेल्वे सेवेची आवश्यकता अधोरेखित केली होती. याशिवाय संसदेतील चर्चांपासून ते रेल्वे समित्यांच्या बैठका, वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबतच्या चर्चासत्रे आणि रेल्वेमंत्र्यांना दिलेल्या निवेदनांमधून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नवीन रेल्वे सेवा, प्रवासी सुविधांमध्ये वाढ आणि तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांना प्राधान्य देण्याची मागणी त्यांनी सातत्याने मांडली होती. या सर्व प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेसचा प्रारंभ हा अहिल्यानगर जिल्ह्याच्या रेल्वे विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रवाशांची मागणी पूर्ण होत असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, या रेल्वे सेवेचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

## घोडेगावात जुगार अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शनिशिगणापूर** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे सुरू असलेल्या अवैध जुगार व्यवसायावर सोनई पोलिसांनी सोमवारी (दि.१५) धडक कारवाई करत दोन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत कल्याण मटका जुगार खेळणारे आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, (दि.१५) रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास घोडेगाव येथील बसस्थानकाजवळ असलेल्या पत्र्याच्या टपरीवर सोनई पोलिसांनी छापा टाकला. यावेळी फारुख इमामसाहेब पठाण (वय ५४) व पप्पू उर्फ आकाश मच्छिंद्र टेमकर (दोघे रा. घोडेगाव) हे विनापरवाना कल्याण मटका जुगार चालवत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळावरून १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल, ३७० रुपये रोख रक्कम तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर पोलिसांनी गावातील स्मशानभूमीजवळील दुसऱ्या पत्र्याच्या टपरीवर छापा टाकला. या ठिकाणी नवनाथ महादू पवार (वय ४५) व पप्पू उर्फ आकाश मच्छिंद्र टेमकर हे कल्याण मटका जुगार खेळताना व खेळविताना आढळून आले. या कारवाईत ६१० रुपये रोख रक्कम व जुगारासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले.या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल महेंद्र पवार यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

## 'कत्ती' घेऊन दहशत माजवणारा अल्पवयीन मुलगा पकडला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक गावात हातात लोखंडी कत्ती घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलास घारगाव पोलिसांनी गुरुवारी (दि. ११) दुपारी पाठलाग करून रंगेहात पकडले. त्याच्याकडून १ हजार रुपये किमतीची धारदार कत्ती जप्त करण्यात आली असून, घरगुती वादातून चुलत्याचा 'काटा काढण्यासाठी' तो गावात फिरत असल्याची धक्कादायक कबुली त्याने पोलिसांना दिली. घारगाव पोलीसाना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, एक अल्पवयीन मुलगा गावात घातक शस्त्र बाळगून दहशत माजवत आहेत.

त्यानुसार पोलीस पथकाने पंचांसह तातडीने मांडवे बुद्रुक येथे सापळा रचला.पोलिसांची चाहूल लागताच संबंधित मुलाने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र सतर्क पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, ४९ सें.मी.लांबीची आणि लाकडी मूठ असलेली धारदार लोखंडी कत्ती पोलिसांना मिळून आली.चुलत्यासोबत असलेल्या घरगुती वादाचा सूड घेण्यासाठी हे शस्त्र आणल्याचे त्याने चौकशीत सांगितले.घारगाव पोलीस ठाण्यात संबंधित अल्पवयीन मुलावर भारतीय हत्यार कायदा (शस्त्र अधिनियम) आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉ. दत्तात्रय चौधरी करत आहेत.

## बेलापूर परिसरात गुटखा विक्री तेजीत ?

### 'चोरी -चोरी चुपके चुपके' होतोय विक्री

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असताना श्रीरामपूर शहर आणि बेलापूर परिसरात मोठ्या प्रमाणावर गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहेत.विशेष म्हणजे 'चोरी - चोरी चुपके चुपके' या पद्धतीने गुटखा विक्री फंडा सध्या परिसरात पहायला मिळतो. या कारवाई कधी होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. शहरातील रेल्वे पटरी अलीकडील व पलीकडील भागातील अनेक पानटपऱ्यांवर गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.विशेष म्हणजे, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी गुटखा विक्रेत्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याचा इशारा दिला असतानाही श्रीरामपूरमध्ये गुटखा विक्रीवर कोणताही प्रभाव पडलेला सध्या दिसत नाहीत. याउलट, बंदीमुळे गुटखा आणखी चढ्या भावाने विकला जात असून, ग्राहकांकडूनही त्याची मोठ्या प्रमाणात खरेदी होत असल्याची चर्चा आहेत.

शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर पडलेल्या रिकाम्या गुटखा पुड्या आणि भिंतींवर दिसणाऱ्या पिचकाऱ्यांचे डाग हे गुटख्याच्या वाढत्या वापराचे आणि विक्रीचे जिवंत पुरावे मानले जात आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही भागांमध्ये गुटख्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होत असून त्यामागे संघटित रॅकेट कार्यरत असल्याचीही चर्चा सुरू आहे.गुटखा विक्रीवर कठोर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी अद्याप प्रभावी मोहीम राबवलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक आरोग्याला घातक असलेल्या या प्रकाराकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहेत.

## दारूच्या नशेत बस चालविणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण करत दारूच्या नशेत एस.टी. बस चालविणाऱ्या चालकाविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून या घटनेमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेवासा आगाराचे डेपो व्यवस्थापक प्रशांत ज्ञानदेव घुले (वय ३८) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. आरोपी चालक आनंद भूपाल कांबळे (रा. देवाळे, ता. करवीर, जि. कोल्हापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बस वाहक साईप्रसाद राजकुमार अतिग्रे (रा. शिवाजी पेठ, ता. करवीर, जि. कोल्हापूर) याचाही या प्रकरणात उल्लेख आहे. ही घटना रविवारी (दि. १४ जून) रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास घोडेगाव (ता. नेवासा) येथील हॉटेल दीपकसमोर उघडकीस आली. पोलिसांनी एमएच-१४ एलएक्स-८९३५ क्रमांकाची एस.टी. बस तपासणीसाठी अडवली असता चालकाने मद्यप्राशन केल्याचे निदर्शनास आले. प्राथमिक चौकशी व वैद्यकीय तपासणीनंतर चालक दारूच्या नशेत बस चालवत असल्याचे स्पष्ट झाल्याने त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. चालकाची प्राथमिक वैद्यकीय तपासणी घोडेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आली. त्यानंतर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार एन. आर. तुपे करीत आहेत. कारवाईत डी. एम. गावडे, ए. एच. तमनर यांच्यासह पोलीस पथकाने सहभाग घेतला.

## अवैध माती वाहतूक करणारा हायवा महसूलच्या जाळ्यात

**धडक कारवाईमुळे उत्खनन माफियांची पळापळ**



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील म्हैसगाव, दरडगाव थडी, मायराणी, चिखलठाण परिसरात गेल्या अनेक दिवसा पासुन मोठ्या प्रमाणात मातीचे अवैध उत्खनन व वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. या प्रकारामुळे शासनाच्या महसुलाचे लाखो रुपयांचे नुकसान होत असून पर्यावरणालाही शेतीला मोठा फटका बसत असल्याची भावना ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात होती. यासंदर्भातील वृत्त प्रसारित झाल्यानंतर महसूल विभागाने अखेर कठोर पावले उचलत अवैध उत्खनन आणि वाहतुकीविरोधात धडक विशेष मोहीम सुरू केली आहे.

सोमवारी( दि. १५) जून २०२६ रोजी दुपारच्या सुमारास म्हैसगाव-ताहाराबाद घाट परिसरात महसूल विभागाने सापळा रचून कारवाई केली. मंडळ अधिकारी योगेश भालेकर, ताहाराबाद व म्हैसगावचे तलाठी बाबासाहेब पंडीत यांनी महसूल विभागाच्या पथकाने अवैधरित्या मातीची वाहतूक करणारा एक हायवा (डंपर) पकडला. या वाहनाची तपासणी करून घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असुन त्यानंतर संबंधित हायवा पुढील कायदेशीर कारवाईसाठी ताब्यात घेऊन राहुरी तहसील कार्यालय व राहुरी पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले. या कारवाईची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच अवैध उत्खनन आणि वाहतुकीत गुंतलेल्या इतर वाहनचालकांमध्ये घबराट निर्माण झाली.

अनेक वाहनांनी तातडीने मार्ग बदलल्याचे तर काही वाहनांनी परिसरातून पळ काढल्याचे प्रत्यक्षदर्शींनी समजले. नदीपात्र, माती उत्खनन क्षेत्र आणि ग्रामीण रस्त्यांवर सुरू असलेली वाहनांची वर्दळ अचानक कमी झाल्याचेही दिसून आले. स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी महसूल विभागाच्या या कारवाईचे स्वागत केले असून अशा धडक मोहिमा सातत्याने राबविण्याची मागणी केली आहे. अवैध उत्खननामुळे शेतजमिनींचे नुकसान, रस्त्यांची दुरवस्था, रस्त्यावर माती पडत जाते त्यामुळे भूजल पातळीवर होणारा परिणाम आणि पर्यावरणीय समतोल बिघडत असल्याने प्रशासनाने कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. विशेष म्हणजे, राहुरी तालुक्यातील विविध भागांमध्ये माती, मुरूम आणि वाळूच्या अवैध उत्खननाबाबत वारंवार तक्रारी होत असतानाही अनेक ठिकाणी हा प्रकार सुरूच असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. त्यामुळे केवळ एक-दोन वाहनांवर कारवाई करून न थांबता उत्खननाच्या मूळ ठिकाणांवर छापे टाकून दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. महसूल विभागाच्या या धडक कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पुढील (दि १६ ) रोजी तहसीलदार व मंडलाधिकारी, तलाठी हे नदीपात्रात किती खड्डे व किती माती उपसली आहे. याचे मोजमाप करून दंड आकारला जाणार आहे.

व पंचनामा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. याच काही दिवसांत आणखी मोठ्या प्रमाणात तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.शासनाचा महसूल वाचविण्यासाठी तसेच पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी अशा कारवाया अधिक प्रभावीपणे आणि सातत्याने सुरू ठेवाव्यात, येणार आहे अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

***मुळा नदीपात्र माती उपसा चालू आहेत. यावर लवकर लवकर आवश्यक कारवाई करण्याकामी तहसीलदार यांना उपविभागीय अभियंता मुळा पाटबंधारे राहुरी यांचे आदेशाचे पत्र देण्यात आले.***

## तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त करणारा आरोपी साताऱ्यातून जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : मानसिक त्रास देऊन तरुणाच्या आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी फरार असलेल्या आरोपीला शेवगाव पोलिसांनी सातारा जिल्ह्यातून ताब्यात घेत अटक केली आहे. आरोपीचे नाव सोहेल राजू शेख (रा. शेवगाव) असे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या मुलाने शेवगाव येथील सोहेल राजू शेख याच्याकडून उसने पैसे घेतले होते. मात्र आरोपीकडून वारंवार पैशांसाठी तगादा लावत मानसिक त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून फिर्यादीच्या मुलाने दि. १३ जून रोजी दुपारी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

या घटनेप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता. त्याच्या शोधासाठी शेवगाव पोलिसांनी विविध पथके तयार केली होती.

आरोपी शेवगाव, जालना, छत्रपती संभाजीनगर परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शोध मोहीम राबवली. अखेर आरोपी सातारा जिल्ह्यातील वाई येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिस पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार तसेच शेवगाव पोलीस ठाण्यातील पथकाने सहभाग घेतला. आरोपीला पुढील तपासासाठी ताब्यात घेण्यात आले असून प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## रात्रीतून घरासमोर झोपलेल्या अल्पवयीन मुलीला पळविले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील मांजरी परिसरातून दि. ११ जून रोजी रात्रीच्या दरम्यान एका अल्पवयीन मुलीचे तीच्या राहत्या घरा समोरुन अपहरण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेतील एक १७ वर्षे ३ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबियांसह राहुरी तालुक्यातील मांजरी परिसरात राहते. दि. ११ जून २०२६ रोजी रात्री १०.३० वाजता घराचे समोरील पटांगणामध्ये झोपी गेले होते. त्यानंतर सकाळी ६ वाजे दरम्यान पिडीत मुलीची आई नेहमी प्रमाणे झोपेतुन उठल्या. तेव्हा त्यांची मुलगी तिच्या जागेवर दिसली नाही. त्यावेळी तिच्या नातेवाईकांनी तिचा घराचे आजुबाजूला परीसरात तसेच गावात शोध घेतला. परंतु ती कोठेही सापडली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी तीला पळवुन नेल्याची नातेवाईकांची खात्री झाली. मुलीच्या आईने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. राहुरी पोलीस पथकाकडून पिडीत मुलीचा शोध सुरु आहे.

# उन्हापासून बचावासाठी फळबागांना आच्छादन

**फळगळतीमुळे उत्पादन घटण्याची भीती**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : यंदाच्या तीव्र उन्हाने श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील फळबागांना मोठा फटका बसला आहे. उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे. उन्हाच्या झळांपासून फळांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी शेडनेट, साड्या व विविध प्रकारच्या कपड्यांनी बागा झाकण्याची धडपड शेतकरी करत आहेत.

मात्र, यासाठी होणारा अतिरिक्त खर्च आणि बाजारातील घसरलेले दर यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहेत. एप्रिल व मे महिन्यांत तापमानाने उच्चांक गाठल्याने मोसंबी, संत्रा, चिकू, आंबा, नारळ, टरबूज, पपई आणि केळी, डाळिंब या फळपिकांवर विपरित परिणाम झाला आहेत. अनेक ठिकाणी फळांवर करपल्यासारखे डाग पडणे, फळगळ होणे आणि दर्जा खालावणे, अशा समस्या दिसून येत आहेत. परिणामी उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहेत. प्रवरा लाभक्षेत्रात अनेक भागात काही प्रमाणात पाणी उपलब्ध असले तरी गेल्या काही वर्षांत फळबागांचे क्षेत्र वाढले आहे.परंतु यंदाच्या उष्णतेमुळे फळबागा टिकविणे हेच शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरले आहे.

काही प्रगतिशील शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचा खर्च करून शेडनेट व कापडी अच्छादनाचा वापर सुरू केला आहे.मात्र अवकाळीच्या गार पिठीमुळे व झालेल्या वादळामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहेत.



त्यामुळे उन्हाचा परिणाम काही प्रमाणात कमी होत असला, तरी सर्वसामान्य शेतकऱ्यांना हा खर्च परवडणारा नसल्याचे चित्र आहे. एकीकडे उत्पादन खर्च वाढत असताना दुसरीकडे फळांना बाजारात अपेक्षित भाव मिळत नाही. खत, औषधे, मजुरी आणि सिंचनाचा खर्च सातत्याने वाढत आहे.

त्यातच डिझेल-पेट्रोलच्या वाढत्या दरांमुळे शेतीकामाचा खर्च आणखी वाढला आहे. काही भागांत इंधनटंचाईमुळे पाणीपुरवठा व अन्य शेतीकामेही प्रभावित होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.शासनाने फळबाग उत्पादकांसाठी विशेष मदत जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा, तसेच उत्पादनाला हमीभाव मिळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

सध्या फळबागा उभ्या करण्याकरिता दरवर्षी मोठा खर्च करा करावा लागतो.मात्र, उत्पादनाला अपेक्षित भाव मिळत नाही. हवामानातील बदल, वाढता खर्च आणि सातत्याने येणारी नैसर्गिक संकटे यामुळे शेतकरी खचत आहेत.शासनाने फळबाग उत्पादकांना योग्य दर मिळवून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात; अन्यथा शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडेल. सध्या डाळिंब फळबागाची लागवड केली आहेत.त्यावर केलेले आच्छादन गारपीठ व वादळी वाऱ्यामुळे नुकसान झाले.

**सुरेश विश्राम थोरात, (प्रगतशील शेतकरी, उक्कलगाव)**

उक्कलगाव : उन्हापासून फळांचे संरक्षण करण्यासाठी डाळिंब बागांवर आच्छादन टाकण्यात आले.